बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक २३ | बुधवार,दि. १७ मे २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या बुकीला नाव न सांगण्यासाठी लाखो रुपये देणारे ते कोण?

**"गोंदिया शहरात कुठे सट्टाव्यवसाय चालत असल्याची माहिती नागरिकांकडून मिळाल्यावर आम्ही त्या दिशेने तपास करुन सट्टा व्यवसायींकावर कारवाई करण्याचे निर्देश सबंधित पोलीस ठाण्यांना दिलेले आहेत.पोलीस प्रशासन शांत बसून नसून प्रत्येक हालचालीवर नजर ठेऊन आहे.बालाघाट पोलिसांनी कारवाईची माहिती स्थानिक पोलिसांना देणे गरजेचे असतानाही दिले नाही".**
**सुनिल ताजणे,उपविभागीय पोलीस अधिकारी,गोंदिया**



**खेमेंद्र कटरे/गोंदिया :** सध्या आयपीएल क्रिकेट जोरात सुरु आहे. आयपीएल क्रिकेट मध्ये सट्टा मटका बुकीचे चांगलेच फावते आहे. यातुनच काही दिवसांपूर्वी गोंदिया येथील एका आयपीएल सट्टा मटका बुकीने आत्महत्येचा प्रयत्न केलेला होता.या बुकीने आपले नाव पोलिसांना तपासादरम्यान न सांगण्यासाठी कुरखेडा, नागपूर व गोंदिया येथील काही बुकींना मोठी रक्कम मोजावी लागल्याची गंभीर तेवढीच धक्कादायक माहिती समोर आली आहे.पोलीसांना जबाब न नोंदविण्यासाठी कुरखेडा,देसाईगंज,नागपूर व गोंदिया येथील सट्टा किंग असलेल्यांनी या आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या इसमाला चक्क ८-१० लाख रुपये मोजावे लागल्याची खळबळजनक माहिती हाती लागली आहे.मात्र तेच बुकी आत्ता असे काही झालेंच नाही असे बोलून इमानदारीचा सोंग घेऊन बसले आहेत.

आता परत याच सट्टा मटका बुकीने आयपीएलच्या पार्श्वभूमीवर पुर्व विदर्भात आयपीएल सट्टा मटकाचे ऑनलाईन सट्टा पट्टी व्यवसायाचे जाळे पसरवलेले आहेत.दररोज घरबसल्या लाखो रुपयांची कमाई करित असुन या मोबदल्यात यंत्रणेला देखील मोठा हप्ता दिल्या जात असल्यानेच कारवाई केली जात नसल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे.

गोंदिया येथील एका सट्टा बुकीने जवळपास चौदा लाख रुपये रुपये सट्ट्यात हरल्यावर ग्राहकांनी तगादा लावल्याने निराशेने ग्रस्त होऊन विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता.गोंदिया येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता सट्टा पट्टी व्यवसायात झालेल्या आर्थिक नुकसान झाले आहे.याबाबतचे जबाब पोलीसासमोर न देण्यासाठी कुरखेडा,नागपूर व गोंदिया येथील बुकींचे नाव पोलीसांना न सांगण्यासाठी चक्क कुरखेडा,देसाईगंज येथील बुकीला सात लाख,नागपूर येथील संतोष बुकी व गोंदियाच्या एका बुकीला ७-१० लाख रुपये मोजावे लागल्याची प्राथमिक माहिती यांच्या गोटातून बाहेर आली असून बुकींनी भरपाई रक्कम देऊन प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करीत तेरी भी चूप मेरी भी चूप असा प्रकार केल्याचे बोलले जात आहे.

सदर प्रकरणात घरगुती आर्थिक कारणाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा जबाब देऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न प्रकरणाने पुन्हा डोके वर काढल्याने या प्रकरणाची पुन्हा चर्चा पुर्व विदर्भातील सट्टा व्यवसायिकामंध्ये सुरु झाली आहे.तर पोलीस खरंच या प्रकरणाची सखोल चौकशी करुन सत्य बाहेर आणणार की शांत बसणार याकडे लक्ष लागले आहे.

**मामा भाचा यांचा सट्टा पट्टी व्यवसाय तेजीत**

सध्या आयपीएल क्रिकेट जोरात सुरु आहे. ३१ मार्च पासुन सुरु झालेला आयपीएल १ जुन पर्यत आहे.गडचिरोली जिल्ह्यात यावर पोलिसांनी चांगलाच वचक ठेवले असतानाच देसाईंगज येथे दोन आरोपींना सट्टाप्रकरणात ताब्यात घेतले आहे.जसजसे दिवस कमी होतील तसतसे आयपीएल रोमांच वाढणार असून आयपीएल ऑनलाईन सट्टा पट्टी व्यवसायाला देखील तेजी येत आहे. याचा पुरेपूर फायदा घेत कुरखेडा येथील जगदीश व लखन नामक या मामा भाचा जोडींने पुर्व विदर्भात जाग-जागी सट्टा पट्टीचे दुकान उघडल्याचे बोलले जात आहे. या दोघांची आपली ऑनलाईन सट्टा पट्टीची आयडी गोंदिया येथील बुकींकडे असुन संपूर्ण हवाला व्यवहार तेथून चालविले जात असल्याची चर्चा समोर आली आहे.

राज्यातील मटका बंद करून अशा घोषणा उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या करीत असले, तरी मटका आणि सट्टा सहजासहजी बंद होणे अवघड असल्याचे चित्र आहे. पूर्वी खूप कसरतीने चालविण्यात येणारा हा धंदा आता अत्याधुनिक तंत्राची जोड मिळाल्याने बिनधास्त व बेधडक सुरू असल्याकडे जाणकार लक्ष वेधत आहेत.

गृहमंत्र्यांच्या पालकमंत्री असलेल्या गडचिरोली,वर्धा, भंडारा,अमरावती जिल्ह्यासह गोंदिया जिल्ह्यात आजही हे धंदे राजरोसपणे फोफावत असल्याचे चित्र असून, पोलिसांकडून थातुरमातुर कारवाई करुन सोडले जाते. पूर्णपणे अटकाव मात्र होतांना दिसत नाही.

रस्त्याकडे पाठ करून असलेल्या टपऱ्या, तेथे गुपचूप होणारे सट्टा पट्टी,मटका बुकिंग, तेथेच जाहीर होणारा निकाल आणि हवाला पद्धतीने होणारे पैशाचे वाटप, अशी स्थिती काही काळापूर्वी या धंद्याची होती. आता मात्र मोबाइल, इंटरनेट अशा प्रगत व ऑनलाईन माध्यमांचा वापर या धंद्यात होऊ लागल्याने पोलिसांना गुंगारा देणे सोपे झाले आहे. सट्टा पट्टी,मटका खेळणाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात युवक सरसावले आहेत.हमाल, मजुरांपासून उच्च शिक्षित आणि व्यापारी, व्यावयायिकांचाही सहभाग वाढू लागला आहे. नेहमीच्या ग्राहकांना घरपोच सेवा दिली जाऊ लागल्याने सट्टा पट्टी मटका नेमका चालतो कोठून हे शोधून काढणे पोलिसांसाठी अवघड बनले आहे.

**"मटकासारख्या जुगार अड्ड्यावर कारवाई सुरू असून, त्या दृष्टीने प्रत्येक पोलिस स्टेशनला तशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार दररोज जुगार अड्डे उद्ध्वस्त केले जात आहेत. पोलिस कर्मचारी मटका चालविणाऱ्यांचा शोध घेऊन, तसेच नागरिकाच्या तक्रारी आल्यानंतर कारवाई केली जात आहे".**
**निलोत्पल बसु, पोलीस अधीक्षक गडचिरोली**

कुरखेडा,देसाईगंज येथील मामा भाचा असलेल्या मटका व्यावसायिकांचा पुर्व विदर्भात मटका चालतो. त्यासाठी मुख्य बुकी आणि त्यांचे सबएजंट अशी साखळी आहे. ते आपापल्या पद्धतीने बुकिंग करतात. अर्थात या नेटवर्कची पोलिसांना अजिबातच माहिती नाही, असेही नसते. वरिष्ठांचे आदेश आले की, पोलीस काही किरकोळ व्यावसायिकांवर कारवाई करतात. ती करतानाही मालकापेक्षा नोकरालाच अटक केली जाते.

त्यामुळे, काही दिवसांत पुन्हा धंदा सुरू होतो. गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्यानंतरही पुर्व विदर्भात ऑनलाईन सट्टा पट्टी सुरू असल्याचे आढळून येत असल्याने सखेद आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

## गोंदियाच्या हॉटेलमध्ये बालाघाट पोलिसांची कारवाई



**रामनगर पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या बालाघाट मार्गावरील जिंजल हॉटेलमध्ये बालाघाट पोलिसांनी धाड घालून आयपीएलवर सट्टा लावणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले.मात्र गोंदियाच्या रामनगर पोलिसांना या प्रकरणाची माहिती सट्टाआरोपींना ताब्यात घेतल्यानंतरही बालाघाट पोलिसांनी का दिली नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे.जेव्हा की बाहेरच्या पोलिसांना स्थानिक पोलिसांना कारवाई करतांना माहिती देणे कायदेशीर बंधनकारक असताना या प्रकरणात बालाघाट पोलिसांनी केलेली टाळाटाळ शंका निर्माण करणारी ठरली आहे.बालाघाट पोलिसांच्या या कारवाईनंतरच्या प्रसारमाध्यमांच्या बातमीनंतर स्थानिक पोलिसांनी सदर हॉटेलात चौकशी करुन माहिती काढून घेण्याचा प्रयत्न केला.**

**विदर्भातील सर्वच जिल्ह्यात आयपीएल सट्टेबाजांवर कारवाई होत असतांना गोंदियात मात्र शांतता आहे, गेल्यावर्षी गोंदिया पोलिसांनी ८-७ कारवाया आयपीएलच्या सट्टेबाजांवर केलेल्या होत्या. त्यातच रामनगर व शहर ठाण्यातील काही कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून गोंदियातील बुकींशी व सट्टाव्यवसायिकांशी संपर्क साधून वरिष्ठांना खूश करत असल्याची चर्चा आहे.या कम चाऱ्याची बदली इतर कुठेही झाली तरी तो येथेच परत का येतो याचा शोध कधीच घेतला गेला नाही.**
**दुसरीकडे याच ठाण्यातील इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी मात्र या पोलीस अधिकाऱ्याच्या वागणुकीमुळे नाराज असल्याचे वृत्त आहे.पोलीस उपनिरीक्षक, सहा.पोलीस निरिक्षकांच्याही कामात ढवळाढवळ करुन आरोपींचा तर कधी कारवाई करण्यापासूनच्याही कामात अडथळा आणत असल्याचे बोलले जात आहे.**
**त्यामुळेच बालाघाट येथून येणारे बुकी गोंदियात बिनधास्त आयपीएल सट्टा चालवत आहेत.येथील भाजी मार्केटमध्ये फळांची दुकान दाखवून क्रिकेटच्या सट्टाबाजीचा व्यवसाय करणारा एक इसम तर राजकीय नेत्यांचा पाठबळ घेत फळविक्रीच्या आडून क्रिकेटच्या सट्टाव्यवसायात रमला आहे,अशा अनेक सट्टाबाजांची आर्थिक बाजू गोंदियातील काही चांगले राजकारणी सांभाळत असल्याचे बोलले जात.व्यवसायातील कमाईला पांढरे करण्याकरीता कुणी कापडाची,फळ,हॉटेलसारखे प्रतिष्ठान उघडून आपला व्यवसाय बिनधास्त करीत असतांना आणि सध्याचा आयपीएलचा हंगाम संपत आलेला असतांना गोंदिया पोलिसांना या प्रकरणात सुगावा न मिळणे आश्चर्यच म्हणावे लागेल.**

# गाजावाजा करून सुरू केलेली "वंदेभारत" एक्स्प्रेस बंद, आता "तेजस" धावणार



**हा तात्पुरता बदल आहे**

**आधी तिकीट काढलेल्या प्रवाशांना दोन गाड्यांच्या प्रवास भाड्यात जो फरक असेल, त्याचा परतावा करण्यात येईल. तसेच ज्यांना तेजस एक्स्प्रेसने प्रवास करायचा नाही त्यांना संपूर्ण प्रवास भाडे परत केले जातील.**
**साकेतकुमार, मुख्य जनसंपर्क अधिकारी, दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वे.**

**नागपूर:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ डिसेंबर २०२२ रोजी लोकार्पण केलेल्या नागपूर-बिलासपूर वंदे भारत एक्स्प्रेसला पुरेसे प्रवासी मिळत नसल्याने या गाडीऐवजी तुलनेने निम्न दर्जाची तेजस एक्स्प्रेस चालवण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे. अशाप्रकारे उच्च दर्जाच्या रेल्वेला पर्याय म्हणून निम्न दर्जाची रेल्वेगाडी चालवण्याचा देशातील हा पहिलाच प्रयोग असल्याचे बोलले जात आहे.

बिलासपूर-नागपूर-बिलासपूर वंदे भारत एक्सप्रेस ऐवजी रविवारपासून या मार्गावर तेजस एक्स्प्रेस सोडण्यात येणार आहे. तेजस एक्स्प्रेसला ११ डबे असतात तर वंदे भारत एक्स्प्रेस १६ डब्यांची आहे. दोन्ही गाड्यांमधील सुविधांमध्ये व प्रवास भाड्यात तफावत आहे. वंदे भारत एक्सप्रेसचे भाडे तेजस एक्स्प्रेसपेक्षा अधिक आहेत.

नागपूर-बिलासपूर वंदे भारत एक्स्प्रेस म्हणून धावणारी रेल्वेगाडी आता सिकंदराबाद-तिरुपती दरम्यान धावणार आहे. या मार्गावर प्रवाशांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे हा बदल करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. संपूर्ण वातानुकूलित असलेल्या वंदे भारत एक्स्प्रेसमध्ये चेअर कार आहे. ही गाडी सुमारे ४१३ किलोमीटरचे अंतर साडेपाच तासात कापते. परंतु रविवार, सोमवार आणि शुक्रवार वगळता या गाडीला अल्प प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने काही उपाययोजना देखील सुचवल्या होत्या. परंतु, आता चक्क रेल्वेगाडीच बदलण्यात आली आहे.

**जूनच्या पहिल्या**

### आठवड्यात मान्सूनचे आगमन

**मुंबई-**यंदा जूनच्या पहिल्याच आठवड्यात भारतात मान्सूनचे आगमन होईल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तसेच, यावर्षी सरासरी ९६ टक्के पाऊस होणार असल्याचा अंदाजही व्यक्त केला आहे. मुंबई आणि प्रादेशिक हवामान केंद्राचे प्रमुख सुनील कांबळे यांनी माध्यमांना मान्सूनबाबत ही माहिती दिली.

# वर्षभरात १५३ बालके कुपोषणमुक्त

**गोंदिया:** जिल्ह्यातील ग्रामीण भागात गरोदर महिलांच्या तसेच लहान बालकांच्या आहार व आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. महिला गार्भावस्थेत असताना तिला संतुलीत आहार मिळत नसल्याने पोटातील गर्भ कुपोषित होते. जन्माला येत असल्याने त्या बालकांना सामान्य श्रेणीत आणण्यासाठी आरोग्य विभाग व महिला व बालकल्याण विभागाला मोठे प्रयत्न करावे लागतात. येथील बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयातील पोषण पुनर्वसन केंद्राने (एनआरसी) २०२२-२३ या वर्षात १५३ बालुके कुपोषणमुक्त केली आहेत.

गोंदिया जिल्हा आदिवासी व नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील असल्याने जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गरोदर महिलांच्या तसेच लहान बालकांच्या आहार व आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु कोरोनाच्या काळात पालकांनी आपल्या पाल्यांकडे विशेष लक्ष दिल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण घटले आहे.

शहरी भागातील बालके गोलमटोल झाली आहेत तर ग्रामीण भागातील कुपोषणसुद्धा कमी झाले आहे. त्याला एकच कारण आई-वडीलांनी कोरोनाच्या काळात आपल्या मुलांकडे विशेष लक्ष दिल्यामुळे त्यांच्या वजनात वाढ झाली आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील अतितीव्र स्वरूपाच्या १५८ बालकांना कुपोषणमुक्त करण्यासाठी २०२२-२३ या वर्षात बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयातील पोषण पुनर्वसन केंद्र (एनआरसी) मध्ये दाखल करण्यात आले होते. त्यापैकी १५३ बालके सामान्य श्रेणीत आली असून कुपोषणमुक्त झाले आहेत.

**जिल्ह्यात चार केंद्र**

गोंदिया जिल्ह्यात दोन सीसीसी सेंटर, ग्रामीण रुग्णालय अर्जुनी मोरगाव व उपजिल्हा रुग्णालय तिरोडा या चार ठिकाणी पोषण पुनर्वसन केंद्र सुरु आहे. या केंद्राद्वारे कुपोषणमुक्तीसाठी चांगले प्रयत्न केले जातात.

**महिलांना ॲनेनिया, बालकांना कुपोषण**

गर्भावस्थेतही भात-भाजी शिवाय दुसरा कोणताही आहार अनेक महिलांना मिळत नसल्यामुळे जिल्ह्यातील ३० टक्के महिलांना ॲनेमिया (रक्तक्षय) असतो. गरोदरपणात योग्य काळजी घरची मंडळी घेत नसल्यामुळे बाल व माता मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले. गंगाबाईत प्रसुतीसाठी येणाऱ्या बहुतांश महिलांचे हिगोग्लोबीन ७ असते. यासाठी खानपानावर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. महिला गर्भवती असतानाच तिला संतुलीत आहार न मिळाल्यामुळे बाळ कुपोषित जन्माला आले. परिणामी त्या बालकांना वाचवायचे कसे हा प्रश्न डॉक्टराच्या समोर उभा राहतो.

### अकोला येथे नवीन पशू वैद्यकीय महाविद्यालय

**मुंबई-**अकोला येथे नवीन पशू वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय आज मंगळवारला झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या महाविद्यालयातील ५६ शिक्षक, ४८ शिक्षकेतर संवर्ग असे १०४ पदे तसेच बाह्य स्त्रोताद्वारे ६० पदे अशी १६४ पदे नव्याने निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली. या पदांसह इतर अनुषंगिक खरेदी वगैरे साठी मिळून ३१६ कोटी ६५ लाख एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पीय भाषणात जळगाव आणि अकोला जिल्ह्यात २ नवीन पशूवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यादृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

# केडमारा चकमकीविरोधात नक्षल्यांची पत्रकबाजी



**गडचिरोली :** भामरागड तालुक्यातील केडमारा जंगल परिसरात ३० एप्रिल रोजी झालेल्या पोलीस-नक्षल चकमकीत कुख्यात नक्षलवादी बीटलू मडावीसह तिघांना ठार करण्यात पोलिसांना यश आले होते. याविरोधात नक्षल्यांनी बंदचे आवाहन केले असून भामरागड मार्गावर पत्रके आढळून आली.

३० एप्रिलरोजी गडचिरोली पोलिसांच्या नक्षलविरोधी सी ६० जवानांनी विशेष अभियान राबवित केडमारा जंगल परिसरात तीन जहाल नक्षल्यांना कंठस्नान घातले. यात पेरमीली दलम कमांडर कुख्यात बीटलू मडावी याच्यासह डीव्हीसी वासू आणि अहेरी दलम सदस्य श्रीकांत ठार झाला. या तिन्ही नक्षल्यांवर अनेक गंभीर गुन्हे दाखल होते. तसेच चळवळीतील महत्त्वाचे नेते म्हणूनदेखील त्यांच्याकडे बघितले जायचे. त्यामुळे ही चकमक नक्षल्यांच्या चांगलीच जिव्हारी लागली आहे.

यासाठी नक्षल्यांनी एक पत्रक काढून १५ मे रोजी बंदचे आवाहन केले होते. याच पार्श्वभूमीवर आज सकाळी आलापल्ली - भामरागड मार्गावरील तलवाडा गावाजवळ बंद यशस्वी करण्याचे आवाहन करणारे पत्रक आढळून आले.माडिया भाषेत असलेल्या या पत्रकात ठार झालेल्या तीन नक्षल्यांचा उल्लेख असून प्रशासनाच्या कारवाईचा निषेध नोंदविण्यात आला आहे. पोलीस विभागाने या घटनेला दुजोरा दिला आहे.

# अर्जुनी नगरपंचायतमध्ये मुख्याधिकारी विरुद्ध नगरसेवक

**स्वमर्जीने केले प्रारुप विकास समितीचे गठन: नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन**



**नगरसेवकांना विश्वासात न घेता कृती**

**सभागृहात नगरसेवकांना विश्वासात न घेता मुख्याधिकारी यांनी नियमांचे उल्लघंन केल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे. याप्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन नगरसेवकांनी केली आहे. नेमणूका रद्द करण्याची मागणी करणाऱ्या नगरसेवकांत दानेश्वर साखरे, सागर आरेकर, राधेश्याम भेंडारकर, अतुल बन्सोड, शीला उईके, सर्वेश भुतडा, दीक्षा शहारे, सुषमा दामले, दिव्या पशीने, संजयसिंह पवार, ललीता टेंभरे, इंदू लांजेवार व सपना उपवंशी यांचा समावेश आहे. त्यामुळे यावर आता प्रशासन काय निर्णय घेते याकडे लक्ष आहे.**

**अर्जुनी मोरगाव:** नगरपंचायतच्या सर्वसाधारण सभेत स्वमर्जीने प्रारुप विकास समितीचे गठन करण्यात आल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे. या प्रकरणाची चौकशी करुन नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी नगरसेवकांनी केली आहे.

स्थानिक नगरपंचायतमध्ये १८ एप्रिल रोजी सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेच्या विषय सुचीमध्ये क्र.३ वर प्रारूप विकास योजना नियोजन समिती गठन प्रक्रिया राबविण्याचा विषय होता. नगराध्यक्ष मंजूषा बारसागडे यांनी मी नगराध्यक्ष असल्याने स्वत: समितीवर जाणारच असे जाहीर केले. उर्वरित दोन सदस्यांसाठी सभापती यशकुमार शहारे व स्थाती समिती सदस्य ममता भय्या यांची आपसात चर्चा करुन निवड झाल्याची माहिती सभेत देण्यात आली. काही नगरसेवकांनी सभापती सागर आरेकर यांचे नाव घेण्यात यावे असे सुचवले. मात्र आमची चर्चा झाली असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे इतर नगरसेवकांना शंका आली. नगरसेवकांनी समिती गठन प्रक्रियेच्या शासकीय पत्राची मागणी केली. २४ मार्चच्या पत्रानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (२) नुसार नियोजन समितीवर स्थायी समितीमधून तीन सदस्यांची नेमणूक करणे आहे.

यात नगराध्यक्ष हे समितीवर जातीलच असे पत्रात नमूद नाही. सभेत हे पत्रसुद्धा दाखविण्यात आले नाही. पत्राबाबत गुप्तता बाळगण्यात आली. नगराध्यक्षांचे सभागृहातील वक्तव्य हे दिशाभूल करणारे आहे. स्थायी समितीमधून या समितीवर तिन्ही सदस्यांची निवड ही सर्वसाधारण सभेत बहुमताने करणे बंधनकारक होती. मात्र ही निवड सभागृहाच्या बहुमताने झाली नाही. यात नियमांचे उल्लघंन करण्यात आले.

नियमब्राह्यपणे केलेल्या नेमणूका रद्द ठरवून नव्याने समिती गठन प्रक्रिया राबविण्यात यावी असा आक्षेप पत्र २४ एप्रिल रोजी नगरपंचायतला दाखल करण्यात आला. यावर नगरपंचायतने जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करण्यास ३ मे च्या पत्रानुसार कळविले आहे.

# नव्या संचमान्यतेमुळे राज्यातील २४ लाख विद्यार्थी शाळाबाह्य तर ६० हजार शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा धोका!



**अमरावती:-** राज्य शासनाच्या नुकत्याच सादर करण्यात आलेल्या संचमान्येतेमुळे २४ लाख विद्यार्थी शाळाबाह्य ठरणार असून राज्यातील साधारणत: ६० हजार शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा धोका निर्माण झाला आहे. या संचमान्यतेमुळे शिक्षण क्षेत्राचे मोठे नुकसान होणार आहे, अशी भीती महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे कार्याध्यक्ष विजय नवल पाटील व सरकार्यवाह रविंद्र फडणवीस यांनी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांना २०२२-२३ च्या संच मान्यतेसंदर्भात एक निवेदन दिले असून त्यात त्यांनी ही संच मान्यता म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे.

उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठासमोर शिक्षक भरती संबंधी सुमोटो याचिका सुरू आहे. या याचिकेत शासनाला २८ एप्रिलपर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिलेले होते. सदर याचिके संबंधी राज्य शासनाच्या प्राथमिक शिक्षण संचालकांनी २७ एप्रिल रोजी एक परिपत्रक काढलेले आहे. यात राज्यातील शिक्षक भरती ही ऑगस्ट २०२३ पासून सुरू करण्याचे संकेत दिलेले आहेत.

या पत्रानुसार १५ मे २०२३ पर्यत राज्यातील सर्व विद्यार्थ्याचे आधार कार्ड सरल प्रणालीमध्ये नोंदवून घेण्याचे व आधार संलग्नीत विद्यार्थी संख्याच गृहीत धरुन संच मान्यता करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

८ मेपर्यंत एकूण २,०९,९६,६२९ विद्यार्थ्यापैकी १,६९,५५,६८६ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड वैध ठरविण्यात आलेल आहेत. एकुण २४,६०,४७३ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अवैध आहेत. १५ मे रोजी हे विद्यार्थी संच मान्यतेमधून वगळण्यात येतील व त्यामुळे साधारणतः २४ लाख विद्यार्थी शाळाबाह्य होतील. यामुळे राज्यातील साधारणतः ६० हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. त्यामुळे राज्यातील शिक्षक भरती ऑगस्टपर्यंत होऊच शकत नाही. यापूर्वी २०१५ मध्ये शिक्षणाच्या हक्क कायद्यातील तरतुदींचा चुकीचा निर्णय घेऊन १७ हजार शिक्षक अतिरिक्त करण्यात आलेले होते. त्यांचे समायोजन अजूनही पूर्णपणे झालेले नाही.

या निर्णयाविरुद्ध सवीच्च न्यायालयात याचिका कमांक ३३३७ /२०१६ व ३३३८/२०१६ प्रलंबित आहेत. वरील प्रलंबित याचिकांचा निर्णय लागेपर्यत "जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचे आदेश नागपूर उच्च न्यायालयाने याचिका क. ४२९०/२०१६ नुसार देण्यात आलेले आहेत, असे विजय नवल पाटील यांनी पत्रात म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने पारीत केलेल्या आदेशानुसार शाळा प्रवेशासाठी आधार कार्ड अनिवार्य करून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या हक्कापासून वंचित ठेवता येणार नाही, हे स्पष्ट केले असतानाही शालेय शिक्षण प्रशासन महाराष्ट्रात शिक्षण हक्क कायदा व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करीत आहे, असे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

साप्ताहिक बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.१७ मे २०२३ २

संपादकीय

# जलव्यवस्थापनाकडे हवे लक्ष

आपण भूतकाळातील कार्यक्षम आणि समृद्ध जलव्यवस्थेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. त्याचा परिणाम संपूर्ण देश भोगत आहे. पाण्यासाठी गावापासून शहरापर्यंत लढा सुरू आहे. जलनीती आणि नियमाअंतर्गत जलस्रोतांचे नियोजन, विकास, वितरण आणि अपेक्षित वापर हे जलव्यवस्थापनासाठी अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. या अनुषंगाने विचार करता देशाने "वॉटर बजेट'च्या मुद्द्याचा आदर्श घ्यायला हवा.

आपल्या देशात वार्षिक पर्जन्यमानातून सरासरी चार हजार अब्ज घनमीटर पाणी येते; परंतु पाणी साठवण व्यवस्थापनाअभावी त्यातील बहुतांश पाणी समुद्रात वाहून जाते. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा आणि झपाट्याने वाढणाऱ्या आर्थिक घडामोडी यामुळे आधीच ताणलेल्या जलस्रोतांवर अतिरिक्त दबाव पडत आहे. आज देशात पावसाच्या पाण्याच्या व्यवस्थापनाबाबत सरकार, शेतकरी आणि ग्रामपंचायती फारशा गंभीर नाहीत. संपूर्ण शेती पाण्यावर अवलंबून आहे. देशात २४ लाखांहून अधिक जलस्रोत आहेत. त्यापैकी शहरी भागात तीन टक्क्यांहून कमी पाणी शिल्लक आहे. शहरांमधील वाढत्या जलसंकटाला हवामानबदल किंवा वाढत्या शहरी लोकसंख्येपेक्षा सामाजिक विषमता अधिक जबाबदार आहे. भारताच्या जलशक्ती मंत्रालयाच्या ताज्या माहितीनुसार, देशातील ५५.२ टक्के जलस्रोत खासगी क्षेत्राच्या ताब्यात आहेत. तलाव, चेक डॅम आदी खासगी हातात आहेत आणि ४४.८ टक्के जलस्रोत सार्वजनिक क्षेत्रातील आहेत. ते ग्रामपंचायती किंवा राज्य सरकारांच्या मालकीचे आहेत. त्यापैकी सुमारे १.६ टक्के (३८ हजार ४९६) जलस्त्रोतांमध्ये अतिक्रमण झाले आहे. पश्चिम बंगालमध्ये सर्वात जास्त टाक्या आणि जलाशय आहेत. आंध्र प्रदेशमध्ये भरपूर टाक्या तर तामिळनाडूमध्ये सर्वाधिक तलाव आहेत; परंतु जलसंधारण योजनांच्या बाबतीत महाराष्ट्र अधिक कार्यक्षम असल्याचे सिद्ध झाले आहे. अशा परिस्थितीत केरळचे पहिले "वॉटर बजेट' हा नवा विषय आहे.

केरळमध्ये नद्या, तलाव आणि नाल्यांची संख्या चांगली आहे; परंतु पावसाळ्यात चांगला पाऊस होऊनही उन्हाळ्यात राज्याला पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. केरळमध्ये असे अनेक भाग आहेत, जिथे दर वर्षी उन्हाळ्यात पाण्याचे संकट उद्भवते. अलीकडेच भारत सरकारने जलशक्ती योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पाणी वाया न घालवता जलसंधारणासाठी शेतक?यांचे प्रबोधन करणे आणि आधुनिक सिंचन तंत्राने सुसज्ज करण्याची योजना आहे. केवळ जलाशयांवर अवलंबून न राहता, शेतकऱ्यांना वर्षभर जलसंधारणाचे तंत्र आणि त्याचा सिंचनात जास्तीत जास्त वापर करण्याचे शिकवले जाईल. तलाव, विहिरी आणि नद्या यांसारख्या नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन करणे राज्य सरकारांना शक्य नाही. पर्यावरणवाद्यांनी या पाणथळांमधील घटत्या पाण्याच्या पातळीबद्दल राज्य सरकारांना अनेकदा इशारा दिला आहे. या जलाशयांचे योग्य प्रकारे संवर्धन केल्यास पाण्याची टंचाई बऱ्याच अंशी कमी होऊ शकते. आज भूगर्भातील जलस्रोत इतक्या वेगाने संपत आहेत की, पाण्यासाठी खोल खोदाई करावी लागत आहे. वस्तुत: पारंपरिक मार्ग अवलंबल्यानंतर दुष्काळ आणि उपासमारीचा धोका बऱ्याच अंशी टळू शकतो. भीषण दुष्काळातही शेतकरी सिंचन करू शकतात. त्यासाठी त्यांनी पाणी कसे साठवायचे, पुरेशी साठवणूक कशी करायची हे समजून घेतले पाहिजे.

एका माहितीनुसार २०२५ पर्यंत आपल्या देशाला पाण्याच्या पातळीच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते. जागतिक स्तरावर ३१ देश आधीच पाण्याच्या टंचाईने त्रस्त आहेत आणि २०२५ पर्यंत ४८ देशांना पाण्याच्या भीषण टंचाईचा सामना करावा लागणार आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार २०२५ पर्यंत सुमारे चार अब्ज लोकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे पाण्यावरून संघर्ष होऊ शकतात. भारतातील वीस मोठ्या शहरांमध्ये तीव्र पाणीटंचाई आहे. जल अर्थसंकल्पाच्या पहिल्या टप्प्याचा तपशील जाहीर करताना केरळ सरकारने म्हटले आहे की, राज्यातील पाण्याच्या उपलब्धतेत घट झाली असल्यामुळे पाण्याचे बजेट आवश्यक झाले आहे. त्यामुळे या मौल्यवान नैसर्गिक संसाधनाचा योग्य वापर करून अपव्यय नियंत्रित केला जाऊ शकतो. या "वॉटर बजेट'ने एक नवा मार्ग दाखवला आहे. यातून धडा घेऊन इतर राज्य सरकारांनीही "पाणी वाचवा'अभियानांतर्गत लोकांमध्ये जागृती करायला हवी. संयुक्त राष्ट्रांनी निश्चित केलेल्या शाश्वत विकास लक्ष्य क्रमांक सहाअंतर्गत, २०३० पर्यंत प्रत्येक व्यक्तीसाठी स्वच्छ पाणी आणि स्वच्छतेची उपलब्धता सुनिश्चित करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे; परंतु ते पूर्ण करण्यासाठी जग योग्य मार्गावर नाही. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जागतिक आणि इतर संस्थांनी हातमिळवणी करणे आवश्यक आहे.

सध्या जगभरातील सुमारे २२० कोटी लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही. २०५० पर्यंत पाण्याची मागणी ५० टक्क्यांहून अधिक वाढण्याची अपेक्षा आहे. वाढणारे सरासरी जागतिक तापमान, समुद्राची वाढती पातळी आणि वितळणाऱ्या हिमनद्या यामुळे वारंवार पूर, तीव्र उष्णता, दुष्काळ आणि वादळे निर्माण होत आहेत. २००१ ते १८ दरम्यान आलेल्या एकूण नैसर्गिक आपत्तींमध्ये पूर आणि दुष्काळाचा वाटा ७४ टक्के आहे. म्हणूनच "ग्लोबल वॉर्मिंग'मुळे उद्भवलेल्या जलसंकटाबद्दल सामान्य लोकांमध्ये जागरुकता निर्माण व्हायला हवी. सरासरी जागतिक तापमानातील वाढ पूर्व-औद्योगिक पातळीपेक्षा जास्तीत जास्त १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवली, तर हवामान बदलामुळे निर्माण होणारी पाणीटंचाई ५० टक्क्यांनी कमी होऊ शकते. "निती' आयोगाच्या अहवालानुसार २०३० पर्यंत, भारतातील पाण्याची मागणी त्याच्या पुरवठ्यापेक्षा दुप्पट असेल. आर्थिक विकास, जलद शहरीकरण, लोकसंख्यावाढ आणि जीवनशैलीतील बदल यामुळे विविध प्रदेशांमध्ये पाण्याची मागणी वाढेल. भारत हा आधीच पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेला देश आहे आणि नजीकच्या भविष्यात तो पाण्याच्या ताणाच्या श्रेणीमध्ये येईल. गेल्या अनेक वर्षांपासून दरडोई पाण्याची उपलब्धता कमी होत आहे. त्यामुळे पावसाचे पाणी साठवणे, खाऱ्या पाण्यापासून पिण्याचे पाणी निर्माण करणे, सांडपाणी प्रक्रिया, पुनर्वापर आणि पुनर्वापर तंत्रज्ञान आदी जलव्यवस्थापन सुधारण्यासाठी महिलांसह स्थानिक लोकांमध्ये सहकार्य निर्माण करण्यासाठी पाठबळ देण्याची गरज आहे.

भारतीय राज्यघटनेनुसार पाणी हा राज्याचा विषय आहे. यामध्ये केंद्राची भूमिका केवळ आंतरराज्यीय नद्यांचे नियमन आणि विकास एवढीच मर्यादित आहे. संविधानाने राज्यांना पाणीपुरवठा, सिंचन, कालवे, बंधारे, जलसाठे आणि जलविद्युत प्रकल्प स्वतः बांधण्याची परवानगी दिली आहे; परंतु हे सर्व २१ व्या शतकातील गरजांनुसार नाही. एकात्मिक जलस्रोत व्यवस्थापन, पर्यावरण प्रवाह, नदी खोरे व्यवस्थापन, जल बाजार, सांडपाणी पुनर्वापर, आभासी जल व्यापारासाठी पाण्याच्या पाऊलखुणा आदी आनुषंगाने अनेक संस्था समान दृष्टी न ठेवता जलक्षेत्रात काम करत आहेत. या क्षेत्राच्या कामकाजाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात पद्धतशीर बदल घडवून आणणे अत्यावश्यक आहे. जानेवारी महिन्यात भोपाळमध्ये आयोजित एका परिषदेत पंतप्रधानांनी "वॉटर-व्हिजन-२०४७'ची रूपरेषा स्पष्ट करताना राज्य आणि केंद्र सरकार आणि त्यांच्या संबंधित विभागांमध्ये परस्पर सहकार्य आणि समन्वय असायला हवा, यावर भर दिला. भारतातील ७० टक्के पाणी वापर कृषी क्षेत्रात होतो; परंतु आंतरराष्ट्रीय मानकांच्या तुलनेत आपली पाणी वापर कार्यक्षमता सुमारे ३०-३५ टक्के कमी आहे. जलवापराची कार्यक्षमता झपाट्याने वाढवून पाण्याची बचत केली, तर हे पाणी औद्योगिक व घरगुती क्षेत्राला पुरवता येईल. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२०-२१च्या अहवालानुसार, दररोज ७२ हजार ३६८ दशलक्ष लिटर पाणी सांडपाण्यात वाहून जाते. त्यापैकी केवळ २८ टक्के म्हणजेच २० हजार २३६ दशलक्ष लिटर पाण्यावर प्रक्रिया केली जाते, उर्वरित नद्यांमध्ये सोडले जाते. सध्याच्या सांडपाणी प्रक्रिया तंत्रज्ञानाला गती देऊन नॅनो-टेक्नॉलॉजी आणि प्रगत ऑक्सिडेशन प्रक्रियेसारख्या प्रगत तंत्रज्ञानाची जोड देऊन या सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यास पाणी पुनर्वापरास उपलब्ध होईल. १९८६-८७ आणि २०१३-१४ या काळात भारतात सिंचन नलिका विहिरींची संख्या तिपटीने वाढली आहे. त्यामुळे देशभरात भूजल पातळी खालावली आहे. जमिनीतून काढलेल्या पाण्यापैकी ९० टक्के पाणी सिंचनासाठी वापरले जाते. त्याची भरपाई करण्यासाठी कृत्रिम पुनर्भरणाला गती द्यावी लागेल. देशातील एकूण ७६६ जिल्ह्यांपैकी २६५ जिल्हे सध्या पाणीटंचाईचा सामना करत आहेत आणि येत्या काही वर्षांमध्ये "पाणी-तणावग्रस्त' बनणार आहेत. यासोबतच पाणीटंचाईच्या यादीत आणखी जिल्ह्यांचा समावेश होणार आहे. जलव्यवस्थापनात परिवर्तन झाले, तरच ग्रामीण भागातील सुमारे ४२ टक्के कुटुंबांना २०२४ पर्यंत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकेल. प्रत्येक नागरिकाने आपल्या सध्याच्या पाणीवापर आणि पाणी व्यवस्थापनाच्या पद्धतींमध्ये आवश्यक सुधारणा करून बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# हिवरखेड (रुपराव)ता.तेल्हारा येथील सत्यशोधक समाज

हिवरखेड हे गाव पुर्वी अकोला जिल्हातील अकोट तालुक्यात समाविष्ट होते. नंतर अकोट तालुक्याचे विभाजन होऊन तेल्हारा तालुका निर्माण झाला. या तालुक्यात हिवरखेड (रूपराव) हे समृद्ध असे गाव असून अकोला जिल्हातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. या गावात सत्यशोधक समाज स्थापना झाला होता. त्याविषयी माहिती येणप्रमाणे.

हिवरखेड (रूपराव) अकोटपासून वीन कि.मी.अंतरावर व तेव्हारा पासून १२ किमी अंतरावर असलेले अकोट ते व्हाया राज्य महामार्गावरील गाव आहे. सदरहू गावात किसन गुणाजी भोपळे हे विद्वान व भारदस्त व्यक्तीमत्वाचे गृहस्थ होते. त्यांनी १८९४ मध्ये आर्य समाज मंदिराची स्थापना केली. त्यांनी वेदोक्त व पुराणोक्त पूजा हा विधी ग्रंथ सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मरते शास्त्री नारोबाबाजी महाधट पानसरे पाटील आणि लक्ष्मण दखमाजी महाधट पानसरे पाटील उभय ता. राहणार ओतूर तालुके जुन्नर, जि.पुणे यांनी २००० प्रति छापून सन १९१० मध्ये प्रकाशित केला होता. या ग्रंथाची किंमत २ रुपये होती. या ग्रंथाला किसन गुणाजी भोपवळे (सत्यशोधक समाज, अध्यक्ष हिवरखेड रूपराव प्रांत वऱ्हाड) यांनी प्रस्तावना लिहिली होती. त्यावेळी त्यांनी वर्तमान पत्राची इच्छा सुद्धा प्रकट केली होती. हा ग्रंथ मुंबई येथील ब्रिटीश इंडिया छापखाण्यात छापला होता. (ग्रंथाची आवृत्ती मला पहावयास मिळाली होती. परंतु ती उपलब्ध झाली नाही.) या ग्रंथात ब्राम्हणवाडा व मुंडगाव येथे शाखा असल्याचे म्हटले होते. वेदोक्त व पुराणोक्त पूजा पद्धती या ग्रंथाची तिसरी आवृत्ती श्री.रा.रा. किसन गुणाजी भोपळे, मु.पो. हिवरखेड रूपराव, जि.अकोला, (वऱ्हाड) यांनी स्वत: शुद्ध करुन हिंदू लोकांकरिता वेद, पुराणे व अनेक ग्रंथ याचे आधारे केला आहे. सन १९२३ इ.किंमत २ रूपये, (हा ग्रंथ विद्याभूषण किसनजी भोवळे, हिवरखेड यांच्याकडे होता. या पुस्तकाचा पहिला भाग इंदप्रकाश छापखाण्यात रा.रा.अनंत गणेश मोळदार, घर नं.२८८ गिरगाव रोड मुंबई येथे आणि १७७ पुष्ठापासून पुढील भाग टयुटोरीयल छापखाना श्रीयुत व्ही.बी. पेंढारकर यांनी मालकाकरिता छापिका व ते पुस्तक किसन गुणाजी भोवळे यांनी हिवरखेड येथे प्रसिद्ध केले. प्रस्तावनेत म्हटले आहे की, मी पुर्वीच्या आवृत्तीत अशुद्ध असणारे कित्येक विषय पुढेमागे छापले गेले होते ती दुरुस्ती करुन पुराणोक्त एका बाजूला वेदोक्त दुसऱ्या बाजूला अशी भिन्न-भिन्न प्रकरणे करुन छापीले आहे.

त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, हे पुस्तक प्रथमत: मी तयार करुन मोठ्या प्रयत्नाने छापले होते. तरी त्यात बरेच अशुद्ध राहिल्यामुळे त्यांची शुद्धता तृतीय आवृत्तीत केली आहे. वेदोक्त पुजा पद्धती हा ग्रंथाची ७ वी आवृत्ती तुळशीराम अमृतराव दांडडे पाटील, रा. खिरपुरी, ता.बाळापूर जि.अकोला यांनी छापला होता. त्यांच्या प्रस्तावनेत महाधट शास्त्री यांनी म्हटले आहे की, १९०२ साली श्री पुजा-पद्धती अथवा स्वयं पुरोहित हा ग्रंथ लहानसा तयार केला. त्या ग्रंथाचे १९०९ पर्यंत तीन वेळा प्रकाशन झाले. एकंदर १०,००० प्रती त्यावेळी खपल्या. त्यानंतर वेदोक्त व पुराणोक्त पुजा पद्धती हा मोठा ग्रंथ तयार करुन मुंबई येथे ब्रिटीश छापखाण्यात छापला. त्यात किसन गुणाजी भोपळे यांनी किंचीत फेरबदल करुन पाच आवृत्त्या काढल्या. याचा अर्थ हा मोठा ग्रंथ १९१० मधील असून तो किसन गुणाजी भोपळे यांनी काढला. त्यात पुराणोकाचे प्रकरणे घातलीत. अर्थात १९२३ नंतरही काही आवृत्ता निघाल्या असल्याची शक्यता आहे. येथील भोपळे घराण्यावर अजूनही आर्य समाजाचा व वैदिक पद्धतीचा प्रभाव आहे. (येथील प्रदीप रामदासजी बंड यांनी माझी बहिण दिलेली असून ते भोपळे घराण्याच्या नात्यात असून तिचा विवाह नोंदणीकरुन वैदिक पद्धतीने झाला होता.) आजही या गावात आर्य समाजपद्धतीने विधी होतात. २३ नोव्हेंबर १९१० च्या पहिल्या दीनमित्रच्या अंकात किसन गुणाजी भोपळे रा. हिवरखेड या नावाने सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात छापली आहे. त्यामध्ये वेदोक्त व पुराणोक्त पुजापद्धती भाग १०, सत्यशोधक निबंधमाला, ब्राम्हणांचा हक्क नाही अशाबद्दल हायकेर्टाचे ठराव, ब्राम्हणोत्तर बंधूस प्रार्थना, इशरा, श्री जोगी गोविंदराव फुले वृत्त, जाहित खबर, हिंदू आणि ब्राम्हण हयात निरनिराळे ५ मनुष्य व त्यांचा संबंध पोवाडा ८ भीमरव विठ्ठल महामुनी वृत्त, ईश्वर स्वरुप, पुराणाची उत्पत्ती, गुरुमंत्र (गायत्रीमंत्र), सत्यसमाज नियम, सार्वजनिक सत्यधर्माची दहा लक्षणे ही पुस्तके आरशात नटून प्रत्येकाने संग्रही ठेवावी असे म्हटले आहे. सदरहू सर्व पुस्तके मागविणारास ३ रुपयात दिली जातील व सर्वास खर्च पाच आणे पडतील. चिल्लर पुस्तकाबद्दल पोस्ट तिकीटे पाठवावी. पुस्तके मागविण्याचा पत्ता सत्यशोधक समाज ऑफीस पोष्ट हिवरखेड रुपराव, जि.अकोला (वऱ्हाड) अशा प्रकारची जाहिरात पहावयास मिळते.



**सतीश जामोदकर**
**हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८**

किसन गुणाजी भोपळे व रावजी चिंधाजी भोपळे हे दोघेजण सत्यशोधक समजाच्या पुणे येथील पहिल्या अधिवेशनाला १७ एप्रिल १९११ ला उपस्थित होते. पहिल्या अधिवेशनाच्या फंडात रावजी चिंधाजी भोपळे यांच्या नावे चार आणे रक्कम देणगी दाखल जमा आहे. (सत्यशोधक समाज परिषद, अ.भा.व कार्यवृत्तांत संपादक प्राचार्य गडामळ माळी) तर किसन गुणाजी भोपळे यांच्या नावे दोन रुपयांची मदत केली असा उल्लेख आहे. किसन गुणाजी यांना केंद्रीय कार्यकरिणीत सदस्यत्व मिळाले होते. १९३३ साली नागपूर येथून प्रकाशित झालेल्या वऱ्हाड प्रांत सत्यशोधक हीरक महोत्सव प्रातिक ५ मुनीची ५९ व्या पृष्ठावर त्यांचा ग्रंथकार (मुख्य) म्हणून उल्लेख आहे.

याच पहिल्या अधिवेशनात महात्मा जोतीराव फुले वृत्त गुलामगिरी पुस्तकाची दुसरी आवृत्ती रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी प्रकाशित केले. ती किसन गुणाजी भोपळे यांनी वाचली आणि २४ माहे जानेवारी १९१२ मध्ये दीन मिनमित्रात तीन पत्र प्रकाशित केले आहे. त्यांनी म्हटले की, दीनमित्र पत्रातील आवाहनानुसार मी गुलामगिरीच्या ५ प्रती बोलविल्या व वाचल्या आणि त्यावर शंका व्यक्त करुन प्रश्न विचारले. त्यावर दीनमित्रकारांनी गुलामगिरीवरील शंका निवारण-१,२ व ३ असे तीन अग्रलेख अनुक्रमे २४ जानेवारी, ३१ जानेवारी व ७ फेब्रुवारी १९१२ च्या अंक १०,११ व १२ मध्ये सविस्तर उत्तर दिले. (अलीकडे सत्यशोधक समाजाचा झेंडा आणि चळवळीचे साहित्य या सायन प्रकाशनातर्फे २८ नोव्हेंबर २०२२ प्रकाशित पुस्तकात त्या अनुषंगाने विस्तृत लेख लिहिला आहे.) किसन गुणाजी भोपळे यांच्या वडीलांचे निधन बातमी दीनमित्र १२ नोव्हेंबर १९१३ च्या अंकात बळीराम बाळुजी माज़ी यांनी पाठविली आहे. त्यांना २२ ऑक्टोबर १९१३ ला मृत्यू बुधवारला झाला होता. त्यांच्या मृत्युने निष्पक्षपाती व सात्विक वृत्तीचा मनुष्य नाहिसा झाला. त्यंचा दफनविधी किसन भोपळे, सीताराम वानखडे व बळीराम वानखडे यांनी आर्य समाजामते केला. प्रेताबरोबर २०० लोक होते. सर्व विधी झाल्यावर दीनमित्र, दीनबंधू व अनायालपास किस भोपळे यांनी दोन रुपये देणगी दिली. बेलुरा येथील सत्यशोधक आनंदराव लढके यांची बहिण तुळशीरामजी नारायणराव भोपळे यांना दिली होती. किसनराव भोपळे यांना जयदेवराव, विद्याभूषणजी व भाऊदेवराव अशी तीन मुले होती. (त्यांचे पणतू डॉ. प्रमोद पंत सत्य व्रतजी भोपळे यांच्या माहितीवरुन) या गावातील पुंडलिक गणाजी राऊत हे सुद्धा पुजाविधीचे कार्यक्रम करीत होते.

अशाप्रकारे हिवरखेड रुपराव येथे सत्यशोधक समाज व आर्यसमाज कार्यरत होता. आज रोजी या गावात आर्यसमाज पद्धतीचा प्रभाव असल्याचे जाणवते. ब्रम्हणांशिवाय ब्राम्हणेतरांनी सर्व विधि करावेत या आर्यसमाज सत्यशोधक समाज मताचे एकमत हिवरखेडवासीयांनी स्विकारले दिसते. असाच प्रभाव येथून पुढे तेव्हाराकडे जाताना लागणाऱ्या बेलखेड या गावी सुद्धा असल्याचे जाणवते. किसन गुणाजी भोपळे यांना वेदोक्त व पुराणोक्त विधीचा ग्रंथ विठ्ठल नारायण वानखडे यांच्याकडे होता. या गावात संपत मारूती नागपुरे हे अशा प्रकारचे विधी करीत होते. सोबत बाबजी तुकाराम उंबरकारढ असत. जयराम भगाजी निमकर्डे यांनी जलशात ब्राम्हणांचा मुलगा म्हणून काम केले होते. पुढे त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत काम केले.

बेलखेड येथे सत्यशोधक माज़ी समाज पंचमंडळ या रजिस्टर्ड संस्थेची स्थापना करण्यात आली होती. त्यामध्ये विठ्ठलराव वानखेडे, गणपतराव राऊत, संपतराव नागपुरे, पुंडलीकराव भड, नागोराव वानखेडे, संपतराव देऊळकार, नामदेवराव अढावू, बाबजी तुकाराम उंबरकार होते. याचे कार्य प्रशिक्षण शिबिरे, भांडी व इतर सामान पुरविणे लग्न व धार्मिक विधी कार्य शिकविणे असे होते.

हिवरखेड रुपराव येथील या शाखेचा परिणाम सभोतवलाच्या परिसरातील गावावर पडला होता. अडगाव, सिरसोळी, मुंडगाव व बेलखेड हे त्यामधील गावे. सदर गावे आज समृद्ध असून शैक्षणिक दृष्ट्या पुढारलेली आहे. हिवरखेड रुपराव येथे सहदेवराव भोपळे यांनी काढलेली शाळा असून शाम भोपळे यांनी काढलेली प्राथमिक शाळा आहे. त्याचप्रमाणे भोपळे भाऊजी हे वऱ्हाड मध्यप्रांतच्या वेळी आमदार राहिले होते. महात्मा फुले शिक्षण संस्था हिवरखेड, १९७२ स्थापना झाली होती. ती सहदेवराव नारायणराव भोपळे यांनी काढली होती. तेव्हारा पंचायत समितीचे सभापती सुद्धा होते. अशाप्रकारे किसन गुणाजी भोपळे यांच्या कार्याचा वसा त्यांनी पुढील पिढी चालवित आहे.

# बाजार समितीच्या सभापती-उपसभापतीपदांसाठी मोर्चेबांधणी

**गोंदिया** : जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकपदांसाठी निवडणूक नुकतीच पार पडली. संचालकपदांच्या निवडणुकीनंतरही सभापती व उपसभापती पदांसाठी निवडणूक होणार असून, आपल्याच पक्षाचा सभापती व उपसभापती असावा, यासाठी राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीस सुरुवात केली आहे.

जिल्ह्यातील आठ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये संचालकांची १८ पदे आहेत. यापैकी देवरी कृषी उत्पन्न बाजार समितीत भाजपा समर्थित पॅनेलचे सर्व १८ उमेदवार अविरोध निवडून आले. उर्वरित १२६ संचालकपदांसाठी नुकतीच निवडणूक घेण्यात आली. यात गोंदिया बाजार समितीमध्ये आ. विनोद अग्रवाल यांची चाबी संघटना व काँग्रेस समर्थित पॅनेलने बहुमत प्राप्त केले. त्यामुळे येथे सभापतीपद चाबी संघटनेला व उपसभापतीपद काँग्रेसकडे जाण्याची शक्यता आहे. आमगाव येथे भाजपा-राकाँ समर्थित पॅनेलने बहुमत प्राप्त केले असून, येथे भाजपाचे माजी आमदार केशवराव मानकर यांचे सभापतीपद निश्चित मानले जात असून उपसभापतीपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून दावा केला जात आहे.

गोरेगाव येथे १८ पैकी १२ जागांवर भाजपा समर्थित उमेदवार निवडून आल्याने येथे सभापती व उपसभापतीपद भाजपा उमेदवाराला मिळणार आहे. सडक अर्जुनी येथे भाजपा समर्थित पॅनेलचे ८ व राष्ट्रवादी काँग्रेस समर्थित ९ संचालक निवडून आले असून एक संचालक शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा निवडून आला आहे. त्यामुळे सभापती, उपसभापतीपदासाठी येथे चुरस पाहायला मिळणार. अर्जुनी मोरगाव येथे भाजपा व महाविकास आघाडी समर्थित पॅनेलचे प्रत्येकी ९ संचालक निवडून आल्याने येथे सभापती व उपसभापतीपदाची निवडणूकही रंगतदार होणार आहे.

त्यामुळे प्रत्येक बाजार समितीमध्ये आपल्याच पक्षाचा सभापती व उपसभापती व्हावा, यासाठी राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला वेग दिला आहे. तर इच्छुक संचालकांनी पक्षातील वरिष्ठ नेते व पदाधिकाऱ्यांकडे पायपीट सुरू केली आहे. युतीत जिथे राष्ट्रवादीचे संख्याबळ अधिक आहे तिथं दावा केला आहे. भाजपामध्ये मात्र वरिष्ठांची मनधरणी, लॉबिंग सुरू असल्याचे चित्र आहे.

# सडक अर्जुनीच्या एक्का वॉटर पार्कमध्ये तरुणाला बेदम मारहाण

**गोंदिया:** सडक अर्जुनी तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गाला लागून असलेल्या डुग्गीपार पोलीस स्टेशनजवळी नयनपूर येथील एक्का ॲडव्हान्चर वॉटर पार्कमध्ये जलतरण तलावात बॉल पासिंग खेळत असताना झालेल्या किरकोळ वादातून बाचाबाची नंतर एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या घटनेतील गंभीर तरुण पंकज नुतेंद्र बिसेन (२४) रा. कुडवा, गोंदिया याला उपचाराकरिता गोंदिया येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते त्यावर रविवारी मध्यरात्री तीन शस्त्रक्रिया करण्यात आली असल्याची माहिती डूग्गीपर ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिंगणजुडे यांनी दिली. डूग्गीपर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रविवारी सडक अर्जुनी येथील वॉटर पार्क मध्ये तुमसर आणि गोंदियातील कुडवा येथील तरुणांचे वेग वेगळे गट मौज मस्ती करण्याकरिता गेले होते.

दरम्यान स्विमिंग पूल मध्ये बॉल पासिंग खेळत असताना त्यांच्यात किरकोळ वाद झाला, बाचाबाची नंतर सदर तरुण पळून जाण्याच्या बेतात असताना तुमसरच्या तरुणांनी त्याला कार पार्किंग परिसरात बेदम मारहाण केली. यात तो जागीच बेशुद्ध पडला त्याला त्याच्या मित्रांनी उपचाराकरिता गोंदियातील खाजगी रुग्णालयात दाखल केले.

या प्रकरणी रविवारी रात्रीच मॉन्टी ओमप्रकाश जैसवाल (३०), प्रभाकर कान्हा गुर्वे (३९) ,भूषण रमेश बिसेन (२७),जीवन गोविंदा डहाके (४४) सर्व रा. तुमसर जि.भंडारा यांना डूग्गीपार पोलिसांनी अटक केली आहे. गंभीर जखमींचा लहान भाऊ फिर्यादी प्रतीक नुतेंद्र बिसेन (२३) याच्या तक्रारी वरुन डूग्गीपार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जनार्दन हेगडकर करीत आहेत.

# शेतकऱ्यांच्या हाती दिल्या तुरी, अन् तोतयांनी लुटली तिजोरी !-धनंजय पाटील काकडे

आतापर्यंत महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात शेतकऱ्यांचे सरकार आले पाहिजे असं मात्र कोणत्याच राजकीय पक्षांनी घोषणा केली नव्हती. किमान अबकी बार, किसान सरकार अशी घोषणा करून काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, बीजेपी या चारही राजकीय पक्षांचे लक्ष शेतकऱ्यांच्या बाजूने वळविण्यासाठी तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी महाराष्ट्रात डरकाळी फोडली. आणि पुढील वाटचाल पाहता महाराष्ट्रातील राजकीय पक्ष हादरल्या झाल्याशिवाय राहणार नाही, एवढे मात्र निश्चित. महाराष्ट्रातील विधानसभेचे २८८ मतदारसंघ लढण्याची ताकद कोणत्याही राजकीय पक्षांनी बोलून दाखवली नाही. तर ती भारत राष्ट्र समितीचे अध्यक्ष व तेलंगणा चे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी हैदराबाद येथे पत्रकार परिषद घेऊन घोषणा केली. हे काही थोडके नव्हे.

शेतकऱ्यांची अवस्था बदलणे हे आता गरजेचे झाले आहे. राजकीय नेते, महाराष्ट्रातील एकमेकांच्या अंगावर धावून जात आहे. ना राहिली आता ध्येयनिष्ठा, अन समाज सुधारण्याची विचारसरणी, संपूर्ण व्यवस्था खाबुगिरीची तयार झाली. नुकत्याच पार पडलेल्या कृषी उत्पन्न बाजार समिती व मागे झालेल्या को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीत, सहकार क्षेत्रातील मक्तेदारी फोपाट्याने वाढली. कृ. उ. बाजार समिती व को-ऑप. बँक हे शेतकऱ्यांना लुटण्याचे कत्तलखाने सुरू झाले. या संचालक मंडळाचे प्रतिनिधी सेवा सहकारी सोसायटी, ग्रामपंचायतच्या माध्यमातून निवडून जातात. आणि यांच्यावर मक्तेगिरी करणारे गावातील नेते, व यांचे सत्ताधीश, नेते शेतकरी आत्महत्या घडवितात. शेतकरी मात्र गाव धेंनड्याच्या मजबुरीत येऊन, स्वतःचीच फसगत करून घेतात, यांचे सत्ताधीश शेतकरी विरोधी निर्णय, राज्य पातळीवर घेऊन शेतकरी संपविण्याचे कटकारस्थाने रचतात. आतातर शासनाची तिजोरी लुटण्यासाठी, सौदेबाजी सुरू झाली. या सहकार क्षेत्रात तर नुसतं तोतये पोसण्याची खानावळ सुरू झाली.त्यामुळे सहकार क्षेत्रच बंद करण्याची वेळ आता जनतेवर आली .

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शिवाजी महाराज, या क्रांतिकारकांचे व समाज सुधारकांची विचारधारा पायदळी तुडविले गेली. आणि भरलेली तिजोरी लुटण्यासाठी भामटेची फौज तयार झाली. पशु,पक्षाचे थवे जसे गगनी फिरतात. हे आता कोण्या झाडावर जाऊन पक्षी बसतील आणि ते किती वाजता रात्रीच उठून बाहेर पडतील अशी अवस्था येऊन ठेपली.रात्री पक्षांनी भरलेलं झाड, सकाळी पहाट होताच मोकाट दिसायला लागली. जशी उन्हाळ्यात गुरे, ढोरे, कडपे सोडून मोकाट सुटतात, असेच चित्र बघायला मिळत आहे. इतकंच नव्हे तर हे हे नेते आता अंगावर धावून मारामाऱ्या करू लागले. ही सर्व लुटारूं फौजेची शासनाच्या डल्लूयातील किमया तर नाही ना?.

आज टी.व्ही. व पेपर हाती घेतला तर सर्व भामट्यांचा बाजार भरलेला दिसतो. नुसतं बच-बच पूरी सुरू झाली. लुटलेल्या तिजोरी पायी नेत्यांची खरेदी- विक्री सुरू झाली . गाई, बैल, बकरी इत्यादी जनावरांची किंमत पाचहजारा पासून एक लाखा पर्यंत गेली, कुर्त्याची किंमत एक हजारा पासून पन्नास हजारापर्यंत गेली, पण आमदार, खासदारकीच्या निवडणुकीत मतदाराची किंमत मात्र फक्त पाचशे रुपये झाली. जनावरापेक्षा माणसाची किंमत घसरली. शेतकऱ्यांनी पिकवलेला अनमोल धान्याची किंमत, सरकारी स्वस्त धान्य दुकानात शासनानेच दोन रुपये ठरवली व वेळे प्रसंग फुकट वाटप सुरू केली. सहाव्या- सातव्या वेतन आयोगाच्या नावावर अधिकाऱ्यांना तिजोरी वाटून मोकळी केली. पगार वाढ करून लोन द्वारे ,वाटलेल्या फोर व्हीलर, कार चे पैसे सरकार चुकवीत आहे. कारखान्यातून फोर व्हीलर बाजारात विक्री होण्यासाठी खेळ तयार झाला. असे चित्र दिसते. शासनातील कर्मचा?यांची किंमत वाढवीली,मात्र जगाला पोशिंदा म्हणणाऱ्यांची किंमत घटविली.त्या आमदार, खासदार, मंत्र्यांना, अधिकाऱ्यांना खाऊ घालणाऱ्या बळीराजाची किंमत मात्र माती मोल केली. शेतमालाची किंमत घसरली तर शेतकऱ्याची किंमत




घसरणारच हे वास्तविक आहे? यालाच म्हणतात भामट्यांचे सरकारी धोरण.

फोडाफोडीच्या वातावरणात ५० खोक्याचे बोके, कोर्टाच्या निकालामुळे एकदम ओके झाले. राज्यपाला सारख्या महत्त्वाच्या पदावर असलेल्या व्यक्तीने चुकीचे कारस्थाने रचून समाजाला बेवकुब बनविले , या नेत्यांनी जनताच लुटली व जनता आता देश पातळीवर आर्थिक धोरणे न बदलविता.... या नेत्यांनाच लूटायला निघाली ? त्यामुळे दिवसेंदिवस नेत्यांची अजून खाबुगिरी वाढत चालली ?

प्रचंड भरलेल्या तिजोरीमुळे व जागतिक बँकेच्या कर्जामुळे लुटालूट सुरू झाली. लुटारूंच्या फौजा तयार झाल्या, गुंडगीरी आणि दहशतीचे वातावरण तयार झाले. सामान्य माणूस सुद्धा भयभीत होऊ लागला, सामान्य माणसाला सुद्धा या लुटारूंनी चट लावून दिली, कारण जनतेला सुध्दा सर्व लुटारूच समोर दिसत आहेत. आणि या लुटारूंच्या व्यवस्थेत शेतकरी मात्र बेसहारा झाला, हवालदिल होऊन तो आशेचा किरण शोधत आहे . नैसर्गिक आपत्ती, गारपीट, रात्रंदिवस, काबाडकष्ट करून पिकवलेल्या धान्याची नासाडी, वन्य प्राण्यांचा हैदोस, लुटारूंच्या फौजेत अडकलेली मान , कुटुंबातील मुलाबाळांच्या वाढत्या अपेक्षा, शेतीमालाचे भाव कमी असल्यामुळे घरात कमी येणारा पैसा,त्यामुळे खर्चाचा ताळमेळ बसत नाही. जीवन जगण्यासाठी विकत घेणा?या बाहेरून औद्योगिक उत्पादनाच्या वस्तूचे कडाडलेले भाव, पाहता त्याच्या डोळ्यासमोर अंधारी येणे सहाजिकच आहे. म्हणूनच तो या जीवघेणी परिस्थितीला कंटाळून आता आत्महत्या कडे वाटचाल करीत आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विधवा महिलांना तूट पुंजी मदत करण्याचा प्रयास सुरू झाला, परंतु मूळ प्रश्न सोडवीला नाही. कारण तो त्यांना सोडवायचाच नाही. भिकार चोट योजना आणून , समाजाला मागे फिरवीणे हा एकची धर्म महाराष्ट्रातच नव्हे तर देशात सुरू झाला आहे . म्हणूनच महाराष्ट्रातील व देशातील नामवंत समाज सुधारक हे लुटारूंच्या फौजेचे राजनीति कार होऊ शकले नाहीत ? .

अन या समाज सुधारकांना निवडून देण्याची हिंमत, सुद्धा जनतेने कां दाखविली नाही?. त्यामुळे या अपयशाची भागीदारी सुद्धा नैतिकतेने जनतेलाच स्वीकारावी लागेल. समाज सुधारकांनी जनतेला मार्गदर्शन करून बाहेर निघण्याचे मार्ग दाखविले, परंतु जनताच भामटेगिरीच्या जाळ्यात फसली. त्याचाच परिणाम आज शेतकरी व जनता भोगत आहे. शेतीमालाचे भावाची मागणी किंवा त्यावर विस्तारवादी चर्चा होणे, ही देश पातळीवरील राष्ट्रीय विचारसरणी आहे. आणि त्यासाठी या देशातील किमान चार- पाच शेतकरी विचारधारेचे मुख्यमंत्री एकत्र येऊन संसदेत ठोस निर्णय घेतल्याशिवाय शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणे दुरापस्त आहे. शेतकऱ्यांना सुध्दा स्वतःचे प्रश्न सोडवण्यासाठी या भामटेगीरीतून मुक्त होउन, स्वतःच्या जगण्यासाठी एकत्र येणे तेवढेच गरजेचे आहे. त्यासाठी अनेक राज्यातील मुख्यमंत्र्यांनी एकत्र येऊन, राष्ट्रीय पातळीवर दबाव निर्माण करावा लागेल. तरच हा प्रश्न सुटेल. नाही तर, शेवटी या भामट्यांच्या चाकोरीनेच वाटचाल करावी लागेल . नाईन इलाजाने जनतेला म्हणावे लागेल आता फुकट खाऊ सौदेबाजानी कुठे नेऊन ठेवला, आमचा भारत देश ?. जय गुरुदेव, जय बळीराजा, जय हिंद.

**धनंजय पाटील**
**काकडे.९८९०३६८०५८.**
**अध्यक्ष - शेतकरी, वारकरी-कष्टकरी महासंघ.महाराष्ट्र.**
**मु.-वडूरा, पोस्ट- शिराळा, ता.-चांदुर बाजार, जिल्हा- अमरावती**

# एक वर्षाच्या कार्यकाळात राबविल्या लोकाभिमूख योजना-जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडालें



**गोंदिया–** ग्रामीण भागातील नागरिकांना जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील सेवा गावातच उपलब्ध करून देण्यासाठी ङ्गजिल्हा परिषद आपल्या दारीफ योजना राबविणार असल्याची माहिती जि. प.चे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी दिली.

बुधवार, १० मे रोजी जि. प.च्या कक्षात त्यांच्या कार्यकाळाच्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित पत्रपरिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी वर्षभरात झालेल्या आणि पुढील काळात करण्यात येणाऱ्या अनेक विकास व लोकोपयोगी योजनांबद्दल सांगितले. पत्रपरिषदेला प्रामुख्याने शिक्षण सभापती तथा उपाध्यक्ष यशवंत गणवीर,बांधकाम सभापती संजय टेंभरे,पशु संवर्धन व कृषी सभापती रुपेश कुथे, महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम, जि. प. सदस्य लक्ष्मण भगत जि. प. सदस्य हनुवत वट्टी, किशोर महारवडे, रजनी कुंभरे, भुमेश्वर पटले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना रहांगडाले यांनी सांगितले की, कोविडच्या प्रादुर्भावाने जि. प.ची निवडणूक वेळेत झाली नाही. दोन वर्षापासून जिल्हा परिषदेवर प्रशासक राज होते. या काळात विकास कामांना ब्रेक लागला होता. जिपच्या निवडणुका गतवर्षी जानेवारीत झाल्या. १० मे रोजी भाजपने गोंदिया जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापित केली. आज सत्ता स्थापनेची वर्षपूर्ती झाली. समाजाच्या प्रत्येक घटकाला विकासाच्या प्रवाहात आणने, हे उद्दिष्ट घेऊन आपण काम करत आहोत. एका वर्षाच्या कार्यकाळात जि. प.ला १२२२ योजना प्राप्त झाल्या. केंद्र शासनाच्या हर घर नल, हर घर जल योजनेमार्फत जि. प. अंतर्गत २०२४ पर्यंत शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यात येणार आहे. यासाठी कार्यशाळा आयोजित करून प्रशिक्षण देण्यात आले आहे. यंदाच्या उन्हाळ्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ५३ टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्ह्यात २८ नवीन अंगणवाड्यांचे बांधकाम करण्यात येणार असून ३ कोटी २८ लाख ६५ हजार रुपये उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे रहांगडाले यांनी सांगितले.

अंगणवाडीतील बालकांच्या वजन मापासाठी अत्याधुनिक वजन काटे जि. प.मार्फत उपलब्ध करून देण्यात येतील. लहान मुलामुलींना गुड टच, बॅड टचसंदर्भात माहिती मिळावी, यासाठी प्रशिक्षण घेण्यात येईल. यासाठी दीड कोटी निधीची तरतूद केली आहे. महिला, युवतींसाठी माफक दरात सेनेटरी पॅड व्हेंडींग मशिनची सोय ग्रापं कार्यालय, माध्यमिक शाळेत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी यांना मुख्यालयी राहून सेवा देण्याचे तसेच ड्युटी चार्ट २४ तासांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दर्शनी भागावर लावून त्याचा फोटो तालुका नियंत्रण ग्रुपवर दर आठवड्याला अपलोड करण्याचे सूचित करण्यात आले आहे. हिराटोला येथे आरोग्य केंद्र स्थापन करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. चांदणीटोला येथे उपकेंद्र व मोहगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याचे रहांगडाले यांनी सांगितले. तासिका शिक्षकांचे २ वर्षापासूनचे थकीत मानधन व मार्च २०२३ पर्यंतचे मानधनाचे १ कोटींची तरतूद करण्याचा निर्णय वार्षिक सभेत घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

आदिवासी तथा नक्षलग्रस्त भागात कार्यरत शिक्षकांना १५ टक्के प्रोत्साहन भत्ता व अतिरिक्त आवास भाडे ४६० रुपये जिपतर्फे मंजूर करण्यात आले. कुपनलिका यांत्रिकी विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात २० टक्के वाढ तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांच्या रिक्त जागांवर २१० स्वयंसेवक नियुक्त करण्याचा निर्णय जि. प.ने घेतला. पीएमशी योजने अंतर्गत गोंदियातील १९ शाळांची निवड झाली आहे. हा आकडा राज्यात सर्वाधिक असून या शाळांच्या सर्वांगिण विकासाठी १ कोटी ८८ लाख रुपये ५ वर्षात खर्च करण्यात येणार असल्याचे अध्यक्षांनी सांगीतले. जिपच्या अख्त्यारीतील काही तलाव बीओटी तत्वावर देऊन त्यांचा विकास करण्यात येणार आहे. या तलावात बोटींग व परिसरात पर्यटन सोयी उपलब्ध करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

जि. प.च्या प्रत्येक शाळेत शुद्ध पाण्यासाठी आरो प्लँट बसविणे, शौचालयांचे बांधकाम करणे या कामांना प्राथमिकता असून, प्रत्येक ग्रापंला बॅटरी ऑपरेटेड कचरा उचल गाडी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे रहांगडाले म्हणाले. जि. प.च्या व्यापारी गाळ्यांचे कोविड काळातील संपूर्ण भाडे माफ करण्यात आले असून, दर ३ वर्षाने १० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. गाव तिथे गोदाम संकल्पनेनुसार प्रत्येक ग्रा. पं. क्षेत्रात शेतमाल साठवण्यासाठी गोदामांचे बांधकाम , क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहनासाठी अटल क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी ३० लाखाच्या निधीची तरतूद करण्यात आल्याचे रहांगडाले म्हणाले. आपसी समन्वयातून गावाचा विकास शक्य असून यासाठी सरपंच परिषदचे आयोजन करून प्रशिक्षण देण्यात आले. बिरसा मुंडा यांच्या यांच्या जयंती दिनी १५ नोव्हेंबर रोजी जिप शाळांना सुटी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

शहीदांच्या स्मरनार्थ जिप शाळांच्या वर्ग खोल्यांना शहीदांचे नाव, जिल्हा परिषेदेच्या आवारात शहीद स्तंभाचे निर्माण करण्यात येणार आहे. जिपतर्फे ओबीसी प्रवगार्साठी व्यक्तीगत योजनांसाठी २५ लाखाची तरतूद, जि. प, पं. स., ग्रा. पं. पदाधिकाऱ्यांच्या विर्शामासाठी जि. प. परिसरात विर्शाम कक्षाचे बांधकाम, जि. प.च्या पशू दवाखान्यांच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी पशू सुधार व सल्लागार समितीचे गठण करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे रहांगडाले यांनी सांगितले.

# नगरपंचायत कार्यालयाला नगरसेवकांनी लावले कुलूप



**गोंदियाः** जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव नगरपंचायतच्या मुख्याधिकाऱ्यांनी शासकीय जागेवरील अतिक्रमणे व निकृष्ठ सिमेंट रस्ते बांधकामाच्या केलेल्या तक्रारीत सापत्न वागणुक दिली.या विरोधात नगरसेवकांनी गुरुवारी (दि.११)नगरपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकले.बांधकाम सभापती व नगरसेवकांवर ही वेळ यावी याचे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नगरसेवकांनी केली आहे.

अर्जुनी मोरगाव येथे शासकीय जमिनींवर अतिक्रमणाचे प्रस्थ वाढले आहे.गेल्या आठवड्यात प्रभाग ३ मध्ये दोघांचे अतिक्रमण कोणतीही पूर्वसूचना न देता पाडण्यात आले.मात्र प्रभाग ६ चे रहिवासी हुसेन ब्राह्मणकर यांचे बांधकाम सुरू आहे. याची बांधकाम सभापती सागर आरेकर यांनी मुख्याधिकार्यांना लेखी सूचना देऊनही कारवाई केली जात नाही.

या विरुद्ध त्यांनी नगरपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा दिला होता.गुरुवारी कुलूप ठोकण्यापूर्वी तहसीलदार तथा प्रभारी मुख्याधिकारी किशोर बागडे यांनी नगरसेवकांना तहसील कार्यालयात येण्याची सूचना केली.त्यांनी जाण्यास नकार दर्शविल्याने ते स्वतः नगरपंचायत कार्यालयात आले.त्यांनी या संदर्भात सर्व कागदपत्रांची शहानिशा केली.ब्राह्मणकर यांना नगरपंचायतच्या वतीने १८ मे पर्यंत अतिक्रमण काढून घेण्याचे लेखी पत्र देण्यात आले. त्यांनी स्वतः अतिक्रमण काढले नाही तर १९ मी रोजी नगरपंचायत काढेल अशी ग्वाही दिली.

यावर नगरसेवकांचे समाधान झाले नाही. हेतुपुरस्सर नगरपंचायतने अधिक कालावधी दिल्याने अतिक्रमणधारक न्यायालयातून कारवाईवर स्थगनादेश आणू शकतो अशी शक्यता नगरसेवकांनी व्यक्त केली.यावर लगेच कॅव्हेट दाखल करण्याची सूचना तहसीलदारांनी केली.यावर नगरसेवकांचे समाधान झाले नाही आणि त्यांनी कार्यालयाच्या प्रवेशद्वाराला कुलूप ठोकले.

## गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत अशासकीय संस्थांनी प्रस्ताव सादर करावा

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य हे देशात जास्त धरणे व जलसाठे असलेले राज्य आहे. दरवर्षी साठवत असलेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. शासनामार्फत धरणामधील गाळ काढून शेतामध्ये वापरण्याकरिता "गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' ही योजना राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व धरणांमधील गाळ उपसा करुन शेतात पसरविल्यास धरणांची मुळ साठवण क्षमता पुनःस्थापित होण्याबरोबरच कृषी उत्पन्नात वाढ देखील होईल. सर्व जलस्त्रोतात गाळ साठणे ही क्रिया कायमस्वरूपी असल्याने सदर योजना राज्यात तीन वर्षापर्यंत मर्यादित न राहता कायमस्वरुपी राबविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

या योजनेत जिल्ह्यातील सर्व अशासकीय संस्थांच्या सहभागाणे त्यांच्याकडील यंत्रसामुग्रीमार्फत धरणातील गाळ काढुन तो शेतात पसरवुन शेतजमीनीची सुपीकता वाढविणे हे या योजनेचे ध्येय आहे. यामध्ये अल्प व अत्यल्प भूधारक, अपंग, आत्महत्याग्रस्त व विधवा महिला शेतकरी यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच या योजनेमध्ये गाळ काढुन तो शेतापर्यंत पोहोचविणे व शेतात पसरविणे याकरिता अशासकीय संस्थांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

सदर योजनेत सहभागी होणाऱ्या अशासकीय संस्थांना यंत्रसामुग्री व इंधनावरील खर्च कायीत्तर प्रदान करण्यात येईल. तसेच गाळ वाहून नेण्यासाठी अल्प व अत्यल्प भूधारक, अपंग, आत्महत्याग्रस्त व विधवा महिला शेतकरी यांना अनुदान देय राहील. हे अनुदान फक्त २.५० एकर पर्यंत अधिकाधिक देय राहील. या योजनेत सहभाग नोंदविण्याकरिता अशासकीय संस्थांनी आपला प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे सादर करावा, असे मृद व जलसंधारण विभागाचे जिल्हा जलसंधारण अधिकारी अनंत जगताप यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# महिला कुस्तीपटूंच्या आंदोलनाला समर्थन

**ब्रिजभूषणसिंहला अटक करण्याची मागणी : पंतप्रधानांना निवेदन**



**गोंदिया:–** राष्ट्रीय कुस्तीपटू संघटनेचे अध्यक्ष ब्रिजभूषणसिंह यांनी आपला लैंगिक शोषण केला असल्याचा आरोप महिला कुस्तीपटूंनी केला. त्याकरिता त्यांचे दिल्ली येथील जंतर मंतरवर आंदोलन सुरूकेले आहे. गोंदिया येथील खेळाडू, वकील, खेळ प्रशिक्षक, विविध सामाजिक संघटनांनी देखील येथील प्रशासकीय भवनासमोर धरणे देत दिल्लीतील आंदोलनाला समर्थन दिले. दरम्यान ब्रिजभूषणसिंह याला पदावरून काढून अटक करण्यात यावी. कठोर शिक्षा करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत पंतप्रधानांना पाठविण्यात आले.

लैंगिक शोषणाच्या विरोधात काही दिवसांपासून कुल्तीपटूंचे दिल्लीतील जंतर-मंतर मैदानात आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला विविध संघटनांचा पाठिंबा मिळत असतानाच कुस्तीपटूंच्या समर्थनार्थ गोंदियात प्रशासकीय भवनासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात सर्वपक्षीय नेते, विविध सामाजिक, शैक्षणिक संघटनांचे प्रतिनिधी, ओबीसी संघटना आणि शहरातील खेळासी संबंधित प्रतिनिधी सहभागी झाले होते. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अनेक पदके पटकावून आपल्या देशाची शान उंचावणारे कुस्तीपटू आंदोलन करीत आहेत. महिला कुस्तीपटूंचे लैंगिक शोषण व अत्याचार करणाऱ्या भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षांवर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी कुस्तीपटूंचे हे आंदोलन सुरू आहे. महिला कुस्तीपटूंवरील अन्याय, अत्याचार भारतीय संविधानाने त्यांना दिलेल्या प्रतिष्ठेने जगण्याच्या हक्काची पायमल्ली तर आहेच, पण आपल्या भारतीय संस्कृतीवर कलंकसुद्धा आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करून भारताचे भूषण ठरलेल्या महिला खेळाडूंवर झालेले अत्याचार ही बाब अतिशय गंभीर, संतापजनक आहे. पद्मश्री पुरस्काराने सन्मानित खेळाडूंना पोलिसांनी केलेली धक्काबुक्की निषेधार्ह अशीच आहे. अन्याय-अत्याचाराविरोधात लढा देत असलेल्या महिला कुस्तीपटूंसोबत उभे राहणे आपले कर्तव्य आहे, असे यावेळी उपस्थितानी सांगितले.

दरम्यान ब्रिजभूषणसिंह यांना अटक करून कठोर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत पंतप्रधानांना पाठविण्यात आले. यावेळी प्रा. सविता बेदरकर, कैलाश भेलावे, मनोज मेंढे, रमेश ब्राम्हणकर, अनील सहारे, डी. एस. मेश्राम, रुपाली उके, जयकुमार, मालती किन्नाके, हेमलता आहाके, राजू मेंढे, ॲड. नरेश शेंडे, ॲड. देवानंद वंजारी, दीपक उके, एम. जी. टेंभूर्णीकर, सोनिया बनसोड, गायत्री सोनवाने, सायली गोस्वामी, धनेंद्र भूरले आदींचा समावेश होता.

# १० वीच्या परीक्षेत गोंदिया पब्लीक शाळेतून खिलेश कडव प्रथम



**गोंदियाः–** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) वतीने नुकताच दहावीचा निकाल जाहिर करण्यात आला. निकालात गोंदिया पब्लीक शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून शाळेतील खिलेश कृष्णराव कडव याने ९५.४ टक्के गुण प्राप्त करून शाळेतून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्याच्या यशाबद्दल शाळा प्रशासनाकडून त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) च्या वतीने दहावीचा निकाल काल (ता.१२) जाहिर करण्यात आला. या निकालात गोंदिया जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेत यश संपादन केले. निकालात गोंदिया पब्लीक शाळेच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम ठेवली आहे. शाळेतील खिलेश कृष्णराव कडव याने ९५.४ टक्के गुण प्राप्त करून शाळेतून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. खिलेशच्या यशाबद्दल शाळेच्या वतीने व्यवस्थापक इंदिरा सपाटे, प्राचार्य जितेंद्र तलरेजा, श्रीमती गौर, वाढई, पारधी, मिनाक्षी, झा, कुथे, प्रभा राव आदि पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

खिलेश कडव याने आपल्या यशाचे श्रेय शिक्षकांसह आजी शांताबाई कडव, वडिल कृष्णराव कडव, आई संगीता कडव, गुणवंत कडव, भास्कर कडव, ज्योती कडव, अनिता कडव, घनश्याम हलमारे, प्रतिभा हलमारे आदिंना दिले आहे.

# आदिवासी वसतिगृहातील वैशाली व हेमलता यांची कॉन्स्टेबलपदी निवड



**गोंदिया:** – एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी, जि. गोंदिया अंतर्गत येत असलेल्या शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृह देवरी क्र.२ येथील वैशाली मुलचंद पदे व हेमलता सदाराम पदे या विद्याथीनींनी सन २०२२-२३ या सत्रामध्ये अत्यंत गरीब परिस्थीतीवर मात करुन पोलीस कॉन्स्टेबल या पदावर यश संपादन करुन आपल्या आई वडीलांचे स्वप्न पुर्ण केले. या यशाबद्दल प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देवुन त्यांचा गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे या दोघी एकाच कुटुंबातील बहिणी (चुलत) आहेत.

नक्षलग्रस्त व दुर्गम क्षेत्र म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्हयातील देवरी प्रकल्पातील चुंभली या आदिवासी बहुल ग्रामीण भागातील या दोघी एकाच कुटुंबातील बहिनींनी अतुलनीय असे यश संपादीत केले आहे. या विद्यार्थिनींनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीत अभ्यास करून आपल्या प्रतिभेची चुणूक दाखविली. त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

गोंदिया जिल्हयातील देवरी प्रकल्पांतर्गत विकास राचेलवार, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी याच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणात स्पर्धा परीक्षेचे विविध पुस्तके उपलब्ध करुन देवुन विद्यार्थ्यांना वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केल्यामुळे त्यांनी हे यश संपादन केले आहे. प्रकल्प अधिकारी यांचे हस्ते शाल, श्रीफळ देवुन त्यांचा गौरव करण्यात आला.

याच पदावर न थांबता वरिष्ठ पदावर जाण्यासाठी प्रयत्न करावे अशा शुभेच्छा राचेलवार यांनी दिल्या. वैशाली मुलचंद पदे व हेमलता सदाराम पदे यांनी मिळविलेल्या यशाचे अन्य विद्यार्थ्यांनी अनुकरण करावे असे त्यांनी सांगितले. शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृह देवरी येथील श्रीमती एस. एल. देवगडे, गृहपाल यांनी सुध्दा वेळोवेळी विद्यार्थ्यांनीचा अभ्यास घेवुन यश संपादन करण्यासाठी जबाबदारी चोखपणे पार पाडली. निवड झालेल्या विद्यार्थिनींनी आपल्या यशाचे श्रेय प्रकल्प अधिकारी, गृहपाल, एच.आर. सरीयाम सहाय्यक प्रकल्प अधिकारी, अरुण सुर्यवंशी सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांचेसह पालकांना दिले आहे.

# दवडीपार येथे मग्रारोहयोतून सिमेंट रस्त्यांचे भूमिपूजन



**गोरेगाव:–** तालुक्यातील ग्राम पंचायत दवडीपार येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत ४ सिमेंट रस्ता व नळयोजना बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले.सदर सिमेंट रस्ते राममंदिर ते किशोर धनलाल कटरेच्या घरापर्यत,मारोती मोटघरेच्या घरापासून ते वामन चामलाटेच्या घरापर्यत,सुशील उपाध्यायच्या घरापासून ते भोजराज कटरे गुरुजीच्या घरापर्यत,नीलकंठ कोल्हटकरच्या घरापासून ते योगेंद्र कटरेच्या घरापर्यत तयार करण्यात येणार आहेत. सोबतच नव प्रतिभा हायस्कूल येथे नळ योजनेचे भुमीपुजन करण्यात आले.सदर कार्यक्रमाला गोरेगाव पंचायत समितीचे सभापती मनोज बोपचे, पं.स.सदस्य किशोर पारधी,सरपंच बि.एम .कटरे, डॉ.साहेबलाल कटरे, उपसरपंच साहेबलाल बिसेन, ग्रामपंचायत सदस्य कुवरलाल कटरे, सौ.सुनिताबाई बिसेन, सौ.दिपकलाबाई पटले, सौ.सुषमताई डोंगरे, सौ.सुनिताबाई कटरे,नव प्रतिभा हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.शरणागत,लुकेश पटले, एच.एस.पारधी, होमेश्वर कटरे तसेच मान्यवर उपस्थित होते.

# तिरोडा येथे कर्तृत्ववान कामगारांचा सत्कार

गोंदिया :– महाराष्ट्र कामगार मंडळ ही कामगार व ऊर्जा मंत्रालयाद्वारे कार्यान्वित शासनाची यंत्रणा आहे. कामगारांच्या कल्याणाकरीता विविध योजना, उपक्रम, आरोग्य शिबीर, मनोरंजनात्मक कार्यक्रम, जनजागृती कार्यक्रम, रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण, सहली व सफारीचे आयोजन करीत असते. त्या अनुषंगाने कल्याण आयुक्त रविराज इळवे, नंदलाल राठोड सहायक कल्याण आयुक्त नागपूर विभाग व कांचन वाणी कामगार कल्याण अधिकारी नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार कल्याण केंद्र तिरोडा च्या वतीने आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त कर्तृत्ववान कामगारांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्ष गौरव वरभे नगर रचनाकार नगरपालिका तिरोडा हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाहरुख खान पठाण घरकुल विभाग प्रमुख नगरपालिका ,नंदलाल राठोड उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलीत करुन रावबहादूर नारायण मेघाची लोखंडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.मान्यवरांनी आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून आपआपले मनोगत व्यक्त केले.

# डेंग्यू आजाराबाबत सविस्तर माहिती : डॉ.वेदप्रकाश चौरागडे

**गोंदिया :** सध्या जिल्ह्यात उष्णतेची लाट सुरु झालेली असून घरोघरी सर्वांनी कुलर, पंखे, ए.सी. यांचा वापर सुरु केलेला आहे. गेल्या आठवड्यात वातावरणीय बदलांच्या परिणामामुळे कुलर, पंखे, ए.सी. यांचा वापर कमी झालेला होता. परंतू वर्तमान स्थिती बघता कुलरमध्ये साठलेल्या पाण्यात डेंग्यू आजाराला कारणीभूत असलेल्या एडीस डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येत आहे. डेंग्यूचा डास हा फक्त आणि फक्त स्वच्छ पाण्यात अंडी घालतो व दिवसा चावतो. कुलरच्या टँकमधील पाणी हे स्वच्छ असते त्यामुळे त्या ठिकाणी डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होत असते. तरी नागरिकांनी आठवड्यातून एकदा कुलरच्या पाण्याची टँक रिकामी करुन डेंग्यू आजाराला कारणीभूत डासांचा नायनाट करावा व डेंग्यू आजारापासून स्वत:चा व परिवाराचा बचाव करावा. अशी माहिती जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.वेदप्रकाश चौरागडे यांनी दिली.

एडीस इजिप्ताय हा डेंग्यू आजारास कारणीभूत डास आहे. कुलरचे टँक, फ्रीजच्या मागे असलेला टब, उघड्या भांड्यातील पाणी (सात दिवसाच्या आत वापरात न आलेले पाणी), कुंडी, फुलदानी, फुलझाड यांच्या खाली ठेवलेली डीश, छतावर अथवा आजुबाजूला पडलेल्या रिकाम्या बाटल्या, जूने पडलेले टायर, घरासमोर नळाच्या पाण्यासाठी तयार केलेले खड्डे, हौद, पाण्याची डबकी इत्यादी ठिकाणी एडीस डासांची पैदास होते.

सात दिवसाचे डासांचे जीवनचक्र असते. अंडी-स्वच्छ पाण्यात घातली जाते. अळी-अंड्याचे दोन ते तीन दिवसात अळीत रुपांतर होते. कोष-अळीचे चार ते पाच दिवसात रुपांतर होते. प्रौढ डास-कोषाचे एक ते दोन दिवसात डासात रुपांतर होते.

एडीस हा डास प्रामुख्याने अंधाऱ्या जागेत वास्तव्य करतो.



साधारणत: हा डास काळे कपडे लोंबकळणाऱ्या दोऱ्या, टांगलेली छत्री या ठिकाणी वास्तव्य करतो.

तीव्र ताप येणे, तीव्र डोकेदुखी, डोळ्यांच्या मागील भागात वेदना, सांधेदुखी, भुक व चव नष्ट होणे, अंगावर पुरळ येणे, मळमळ व उलट्या होणे ही डेंग्यू आजाराची लक्षणे आहेत.

पोटदुखी, सतत उलट्या होणे, नाकातून व हिरड्यातून रक्त येणे, श्वसनास त्रास होणे व श्वसन वेग वाढणे, अतिशय थकवा येणे ही गंभीर अवस्था असते. दुषित एडीस डासाची मादी सामान्य व्यक्तीला चावल्यास डेंग्यू आजाराचा प्रसार होतो.

डेंग्यू आजाराकरीता कोणतेही औषध उपलब्ध नाही. ज्या व्यक्तीला डेंग्यूची लक्षणे दिसतात त्यांनी अजून डास चावणार नाही याची काळजी घ्यायला हवी. ताप आलेल्या व्यक्तीने तात्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा. हे डेंग्यू आजारापासून बचाव करण्याचे उपाय आहेत.

आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळणे, नियमीत कुलरचे पाणी बदलून टब कोरडे करुन पुन्हा पाणी भरणे, पाणी भरलेल्या भांड्यांना झाकण लावणे. डासांची पैदास कमी करण्याकरीता इत्यादी उपाय करावेत.

# आयपीएल सट्ट्यावर धाड; दोघांना अटक; ७.११ लाखांचा मुद्देमाल जप्त

**गडचिरोली:–** आयपीएल क्रिकेटवर ऑनलाईन जुगार खेळत असल्याच्या माहितीवरून देसाईगंज पोलिसांनी धाड टाकून घटनास्थळावरून ७ लाख ११ हजार ६३० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी कमलेश मुरलीधर कुमरे, (२८) रा. शिवाजी वार्ड देसाईगंज, अक्षय रमेश मेश्राम, (२७) रा. गांधी वार्ड देसाईगंज या ऑनलाईन सट्टा चालविणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली. तर दोनजण फरार होण्यास यशस्वी झाले. सदर कारवाई १० मे रोजी करण्यात आली.

सद्या देशात आयपीएलचा सीजन सुरु असून आयपीएलवर सुरु असलेल्या अवैध सट्टाबाजीवर आळा घालून कठोर कारवाई करण्याचे निर्देश संपूर्ण जिल्ह्यातील पोस्टे / उपपोस्टे व पोमके यांना पोलिस अधीक्षकांनी दिले होते. त्या पाश्?र्वभुमीवर १० मे रोजी देसाईगंज येथे आयपीएलवर मोठ्या प्रमाणात ऑनलाईन सट्टा सुरू असल्याची माहिती मिळली. यावरून पोलिसांनी कुथे पाटील हायस्कुल देसाईगंज समोर जाऊन पाहणी केली असता त्याठिकाणी काही ईसम चेन्नई विरुद्ध दिल्ली या आयपीएल क्रिकेट सामन्यावरती अवैध वेबसाईटच्या माध्यमातून सट्टा (जुगार /बेटींग) खेळत असल्याचे मिळून आले. तेंव्हा त्यातील एकास ताब्यात घेऊन विचारपूस करुन मोक्यावर झडती घेतली असता त्याने सांगितले की, सदर वेबसाईटची लिंक, युजर आयडी आणि पासवर्ड इत्यादी अक्षय रमेश मेर्शाम रा. गांधी वार्ड देसाईगंज या व्यक्तीने दिली असुन त्या वेबसाईटच्या माध्यमातून मी अवैध सट्टा लावत असल्याचे सांगितले. तसेच अक्षय मेश्राम हा शहरातील अनेक तरुणांना आयपीएलवर सट्टा (जुगार / बेटींग) लावण्यासाठी युजर आयडी आणि पासवर्ड तयार करून देऊन सट्टाबाजी करण्यास उत्तेजित करीत असल्याचे सांगितल्याने.

त्यानंतर पोलिसांनी शहरात त्याचा शोध घेऊन पाठलाग केले असता लांखादूर टि-पाईट जवळ रोडच्या बाजूला एक जुनी वापरती पांढऱ्या रंगाची हयुडाई केटा वाहन क्र. एमएच ४० एआर ९३६३ अंदाजे किंमत ६,५०,०००/- रुपयाच्या वाहनामध्ये आत बसुन अवैधरित्या आयपीएलवर सट्टाबाजी करीत असताना आढळून आला. पोलिसांनी सदर वाहनाची झडती घेतली असता जुन्या वापरत्या ॲपल, सॅमसंग, रेडमी कंपनीचे मोबाईल फोन, विविध बँकेचे एटीएम कार्ड, काही पर्सनल कागदपत्र, आकडेवारीचे चिठ्ठी व काही रोख रक्कम असा अंदाजे एकुण ७ लाख ११ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल कारवाई करुन जप्त केलेला आहे.

याप्रकरणी देसाईगंज पोलिस ठाण्यात येथे अपराध क्रमांक ०१५५/२०२३ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ व कलम १०९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आली.

# किन्ही, कटंगटोला गावांचे पुनर्वसन करा



## ग्रामस्थांच्या सहमतीनेच कार्य करा

**जिल्ह्यात पुनर्वसन कार्य रखडले आहे. किन्ही, कासा आणि कटंगटोला गावांचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. पुनर्वसनासाठी तयार असलेल्या व नसलेल्या ग्रामस्थांची यादी तयार करावा. तसेच ग्रामस्थांच्या सहमतीनेच पुनर्वसन कार्य करण्यात यावे, अशा सुचना रहांगडाले यांनी केल्या.**

**गोंदिया:** शासन पुनर्वसन तर करते मात्र नागरिक जागा सोडत नाही. यामुळे पुनर्वसन कार्य रखडले. गोंदिया जिल्ह्यातील किन्ही, कासा व कटंगटोला गावांचे पुनर्वसन करणे गरजेचे असून पुनर्वसनासाठी तयार नसलेल्या ग्रामस्थांची यादी तयार करण्यात यावी. स्थानिक ग्रामस्थांच्या सहमती घ्यावी आणि मगच निर्णय घेण्यात यावा, अशा सुचना जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजीत नदीकाठी भागातील पूण परिस्थिती हाताळण्यासाठी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. जून महिन्यात मान्सूनचे आगमन होणार असून जिल्ह्यातील नदी, नाले दुथडी भरुन वाहत असतात. जिल्ह्यातील संजय सरोवर, पुजारीटोला आणि कालीसरड धरणाचे दरवाजे उघडल्यानंतर गोंदिया जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण होते. यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटतो तर काही गावांचे रुपांतर बेटांमध्ये होते. याचा सर्वाधिक फटका जिल्ह्यातील वैनगंगा नदीकाठी वसलेल्या किन्ही, कासा आणि कटंगटोला गावांना होतो. यामुळे शेती आणि घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले पुढे म्हणाले, शासन निर्णय प्रमाणे नदीकाठी वसलेल्या ब्लू लाईन गावांचे पुनर्वसन करण्यात येते. मात्र अद्याप पुनर्वसनाबाबत काहीही प्रगती दिसून येत नाही. ब्लू लाईन गावांचे पुनर्वसन करत असताना शासन फक्त मोबदला देते.

पावसाळा एका महिन्यावर असताना पुनर्वसन कार्य करणे शक्य नाही. त्यामुळे पुरामुळे प्रभावित होणाऱ्या नागरिकांची व्यवस्था करणे बाबत शाळा व शासकीय इमारतीत व्यवस्था करणे व कोणत्याही आपतकालीन परिस्थितीत सामोरे जाण्यासाठी सज्ज राहण्याचा सुचना त्यांनी यावेळी केली. बैठकीला जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपजिल्हाधिकारी चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, जिल्हा परिषद बांधकाम सभापती संजय टेंभरे उपस्थित होते.

# शेकडो हेक्टर शेतीला सिंचन होण्याचे आता केवळ स्वप्नच

## शासनाने पिंडकेपार प्रकल्प गुंडाळला: ३८ वर्षांपासून होता प्रकल्पाचा प्रश्न

**गोंदिया:** शेतकऱ्यांना सिंचनाची सोय व्हावी, दुबार पीक घेता यावे यासाठी गोंदिया तालुक्यात पिंडकेपार प्रकल्प मंजूर करण्यात आला. पण मागील ३८ वर्षांपासून या प्रकल्पाचे भिजत घोंगडे कायम असल्याने अखेर शासनाने हा प्रकल्प गुंडाळण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या मदतीने शेतीला सिंचन होण्याचे स्वप्नच राहणार आहे.

तालुक्यातील पिंडकेपार येथे १९८३ मध्ये मध्यम प्रकल्प म्हणून मंजूरी काम सुरु करण्यात आले. त्यानंतर सुमारे ५० कोटी रुपये या प्रकल्पावर खर्च करण्यात आले. पण यानंतरही अनेक समस्या उद्भवत असल्यामुळे राज्य शासनाने या प्रकल्पाची फाइल बंद केली. त्यामुळे कोट्यावधी रुपयांचा चुराडा झाला. शिवाय शेतकऱ्यांच्या स्वप्नांवरदेखील पाणी फेरले गेले. पिंडकेपार मध्यम प्रकल्पाला १९८३ मध्ये मंजूरी देण्यात आली. त्यावेळी या प्रकल्पाची किंमत २.४३ कोटी रुपये होती. या प्रकल्पाकरिता डव्वा आणि रापेवाडा येथील



शेतकऱ्यांची १५६ हेक्टर जमीन अधिग्रहीत करण्यात येणार होती. मात्र प्रकल्पाच्या मंजूरीपासून आतापर्यंत लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या कामाला गती मिळाली नाही. उलट विविध समस्या येत होत्या. प्रकल्पाला ३८ वर्ष पूर्ण झाले.

२००८-०९ मध्ये या प्रकल्पाची किंमत ४० कोटी ६६ लाख रुपयांवर पोहोचली. त्याउपरही समस्या संपण्याचा नाव घेत नसल्यामुळे अखेर या प्रकल्पाची फाइल बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला. लोकप्रतिनिधींचा पाठपुरा कमी पडल्यामुळे फाइल बंद करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवल्याचा आरोप होत आहे.

### अडीक कोटी रुपयांचा प्रकल्प पोहोचला ४१ कोटीवर

**पिंडकेपार सिंचन प्रकल्पाला १९८३ मध्ये मंजुरी देण्यात आली. तेव्हा या प्रकल्पाची किंमत २ कोटी ४३ लाख रुपये होती. मात्र विविध कारणाने या प्रकल्पाच्या कामाता विलंब होत गेल्याने या प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होत गेली. ३८ वर्षाच्या कालावधीत या प्रकल्पाची किंमत तब्बल ४१ कोटी रुपयांवर पोहोचली. मात्र यानंतरही या प्रकल्पातील विघ्न काही दूर झाले नाही. अखेर शासनाला हा प्रकल्पच गुंडाण्याचा निर्णय घ्यावा लागला.**

### लोकप्रतिनिधीकडून पाठपुराव्याचा अभाव

**पिंडकेपार सिंचन प्रकल्प पूर्ण झाल्यास या प्रकल्पामुळे शेकडो हेक्टर जमीन सिंचनाखाली येण्यास मदत झाली असती, शिवाय शेतकऱ्यांना दुबार पीक घेणे शक्य झाले असते. मात्र या प्रकल्पासाठी लोकप्रतिनिधींकडून सक्षम पाठपुरावा न झाल्याने अखेर हा प्रकल्पच कायमचा रखडला.**

# बॅक वाटरचा धोका कायम

**गोंदिया:** पावसाळ्यापुर्वी करायची कामे पालिकेने हातात घेतली आहे. शहरातील कृत्रिम पूरपरिस्थिती टाळण्यासाठी पालिकेने शहातील मोठ्या नाल्यांची स्वच्छता सुरु केली आहे. मात्र शहरात अनेक ठिकाणी या मोठ्या नाल्यांवर अतिक्रमण करण्यात आले आहे. पक्के बांधकाम झाले आहे. तेथील गाळ तसाच कायम आहे. त्यामुळे जोरदार पाऊस झालाच तर शहरात बॅक वॉटरमुळे धोका कायम आहे.

गोंदिया हे शहर तांदूळनगरी आणि नागपूर नंतर विदर्भातील मोठी बाजारपेठ म्हणून ओळखले जाते. दक्षिण-पूर्ण मध्य रेल्वे मार्गावर हे शहर असल्यामुळे या शहराला अधिकच महत्व प्राप्त झाले आहे. शहरात पुर्वीपासून मोठे नालेही वाहतात. हे नाले शेवटी पांगोली नदीत विसर्जित होतात. पुर्वी या नाल्यांमध्ये शहरातील कचा फेकला जात असायचा. त्यामुळे पावसाळ्यात थोडा जरी गाऊस झाला तरी बॅक वाटरमुळे शहरात पुरपरिस्थिती निर्माण व्हायची. आता नगरपालिकेच्या वतीने घराघरातून कचरा संकलन करण्यात येत आहे. तरीही अनेक व्यावसायीक, हातठेलेधारक या नाल्यांमध्येच कचरा टाकतात. यशिवाय अनेक ठिकाणी शौचालयाची घाणही या नाल्यांमध्ये सोडली जाते. त्यामुळे अशा नाल्यांमध्ये गाळ साचणे सुरुच आहे. संभाव्य पूरपरिस्थिती टाळण्यासठी नगरपालिकेने सध्या या मोठ्या नाल्यांची सफाई केली जात आहे. अनेक ठिकाणी सफाई कामगार स्वत:च काम करीत आहेत तर काही ठिकाणी जेसीबी लावण्यात आला आहे. ये नाले मोकळे आहेत केवळ तेथील स्वच्छता केली जात आहे. मात्र, शहरातील बहुतांश ठिकाणी मोठ्या नाल्यावर अतिक्रमण करण्यात आले आहे. अशा अतिक्रमणित नाल्याची सफाई मजुरांकरवी किंवा जेसीबीनेही होत नाही. नगरपालिकेला आजवर तोडगा काढता आला नाही. त्यामुळे येथील



गाळ अनेक वर्षांपासून उपसला नाही. यंदाही अशा नाल्यांमधील गाळ तसाच आहे.

**या भागांना बसतो फटका**

पावसाळ्यात येणारे पाणी नाल्यांतून वाहून जात नाही. परिणामी पुरसदृश्य स्थिती निर्माण होवून नाल्यातील बॅकवाटरचा झटका संजयनगर, गौरीनगर, छोटा गोंदिया, सूर्याटोला, रिंगरोड या भागांना बसतो. हा प्रकार दरवर्षीचाच आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी होत आहे. कुडवा परिसरात असलेला एक मोठा नाला एका प्लाटींगधारकाला लाभ पोहोचवून देण्याकरिता अरुंद आणि वळता करण्याचा घाट घातला जात असल्याचे सुत्रांनी सांगितले.

**नाल्यांमध्ये प्लास्टिक बाटल्यांचा खच**

जिल्ह्यात दारुबंदी नसली तरी मद्यशौकीन दारुच्या दुकानातून दारु विकत घेऊन अशा नाल्यांच्या काठावर जावून दारु पितात. रिकाम्या पाण्याच्या आणि दारुच्या बाटल्या नाल्यात फेकण्यात येतात. अनेक अंडी आणि भज्यांच्या दुकानावर दारु पिण्याची सोय करण्यात आली. दुकानदार रिकाम्या बाटल्या नाल्यांमध्ये फेकतात. नाले सफाई मोहिमे दरम्यान मोठ्या प्रमाणात अशा दारुच्या बॉटल्स मलब्यातून निघाल्या. या बाटलांचा असा खच नाल्यांमध्ये वाढत राहिला तर नाल्यातील पाणी अडले जाण्याची शक्यता आहे.

# एमआयडीसी गोरेगाव येथे त्वरित सुविधा पुरवा-रेखलाल टेंभरे

**गोरेगाव:-** गोरेगाव येथे एमआयडीसी स्थापना होऊन २५ वर्षे झाली. गेल्या २५ वर्षांत एमआयडीसी गोरेगावचा विकास झाला नसुन एमआयडीसी परिसर हा दारुड्यांचा अड्डा तर चोरीचे ठिकाण झाले आहे.या परिसरात गुंड प्रवृत्तीच्या लोकांचे वास्तव्य झाले आहे.एमआयडीसी परिसरात पाणी, रस्ते, सुरक्षा रक्षक, स्ट्रीट लाईट व पार्किंगची व्यवस्था करण्याकडे एमआयडीसीचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करीत सुविधा पुरवण्याची मागणी जिल्हा बँकेचे संचालक रेखलाल टेंभरे यांनी केली आहे.

कारखानदार व व्यापारी कोणताही उद्योग/व्यापार करण्यासाठी पैशाची कितीही जोखीम घेण्यास तयार असतात. परंतु त्यांना साधने-सुविधा जसे की पाणी, रस्ते,विज, पार्किंग व अन्य आवश्यक व्यवस्था उपलब्ध हव्या असतात. एमआयडीसी गोरेगाव येथे स्ट्रीटलाईट, वाहतूक व इतर सर्व सुविधा उपलब्ध करून द्यावा अशी मागणी रेखलाल टेंभरे यांनी एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी यांना केली.

# जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढा

**गोंदिया-** प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या मागण्यावर जिल्हा परिषद गोंदिया प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याने जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हा अध्यक्ष पी.जी. शहारे यांचे नेतृत्वात दिनांक ९ मे रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले व सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर यांची भेट घेऊन प्रलंबित मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन, लिपिक कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संतोष तोमर, सुभाष खत्री आदी उपस्थित होते.

ज्या कर्मचाऱ्यांची सेवा दहा वर्ष पूर्ण झाली.त्यांचीच प्रशासकीय बदली करावी, दहा वर्षाच्या आतील सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांची प्रशासकीय बदली करण्यात येऊ नये. अंतर्गत विभाग बदलीची कार्यवाही करण्यात यावी. तक्रार निवारण समितीची सभा घेण्यात यावी. बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे. नियमित पदोन्नती/कालबध्द पदोन्नतीची प्रकरणे निकाली काढण्यात यावे या आणि इतर मागण्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# गोंदियात काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला कर्नाटक विजयाचा आनंदोत्सव



**गोंदिया:-** येथील शहीद भोला काँग्रेस भवन समोर काँग्रेस कार्यकर्त्यांनी कर्नाटक विधानसभेमध्ये काँग्रेस पक्षाला घवघवीत यश मिळाल्याबद्दल भव्य आतिषबाजी करून आणि मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा केला.राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेत दरम्यान पायी चालत गेलेल्या विधानसभा क्षेत्रामध्ये विशेष यश संपादन केल्यामुळेच काँग्रेसला कर्नाटकमध्ये विजयाचा मार्ग सुकर झाला.

जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी यावेळी अखिल भारतीय काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, यूपीए चेअर पर्सन श्रीमती सोनिया गांधी, काँग्रेस नेते राहुल गांधी, श्रीमती प्रियंका गांधी तसेच प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या अभिनंदनाचा ठराव सुद्धा एकमताने पारित केला. त्यानंतर शहीद भोला काँग्रेस भवन समोर येऊन कार्यकर्त्यांनी विजय उत्सव साजरा केला. याचा प्रभाव महाराष्ट्रातील राजकारणात सुद्धा पडणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले तसेच २०२४ मध्ये भाजपाचा प्रभाव अतिशय कमी झालेला दिसेल अशी आशा वाटू लागलेली आहे.

यावेळी प्रामुख्याने जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष दिलीप बनसोड, प्रदेश काँग्रेसचे सचिव अमर वराडे,पी.जी.कटरे, सूर्यप्रकाश भगत, श्रीमती वंदनाताई काळे, उषाताई मेंढे, जितेंद्र कटरे,पी.सी.चव्हाण, परवेज बेग, रूपाली उके, दीपक, पप्पू पटले, नीलम हलमारे,योगेश अग्रवाल, भरत खापर्डे,प्रदीप सहारे, सीमा लोखंडे, अमर राहुल, विकास शेंडे, मंथन नंदेश्वर, गौरव भिसेन, केदार शरणागत, आम्रपाली कोटांगले, मनीष चव्हाण इत्यादी प्रमुख कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# वाचनालय ही लोकचळवळ व्हावी-आ.चंद्रीकापुरे



**अर्जुनी मोरगाव:** आजच्या आधुनिक काळात मोबाईल व इंटरनेटमुळे वाचनसंस्कृती लोप पावत चालली आहे. त्यामुळे वाचनालयांनी विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना वाचण्याची आवड निर्माण होईल या परीने कार्य करुन वाचनालयात ही लोकचळवळ होईल या परीने कार्य करावे, असे प्रतिपादन आ.मनोहर चंद्रीकापुरे यांनी केले.

अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील शासनमान्य वाचनालयाला पुस्तक वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आ.मनोहर चंद्रीकापुरे यांच्या स्थानिक विकास निधीतून मौजा कोहमारा (एरिया ५१) येथे अर्जुनी मोरगाव तालुक्यातील १८, सडक अर्जुनी तालुक्यातील ३९, व गोरेगाव तालुक्यातील ११ एशा एकुण ६० वाचनालयाला आपल्या निधीतून ५० लाखांची स्पर्धात्मक व ग्रंथ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला जि.प. सदस्य सुधा रहांगडाले, पंचायत समिती सदस्य डॉ. रूकिराम वाढाई, शिवाजी गहाणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक इंजिनीयर डी.यु. रहांगडाले, दादा संग्रामे, भागवत झिंगरे, अनिता बांबोर्डे, एफ.आर.टी. शहा, पत्रकार बिरला गणवीर, आर.वी.मेश्राम, अनिल मुनेश्वर, शाहीद पटेल, सुशील लाडे, चंद्रमुनी बन्सोड व सर्व साठही ग्रंथालयाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन करुन आभर महेंद्र चंद्रीकापुरे यांनी मानले.

# "त्या' वाघांना एनएनटीआरमध्ये आणण्याच्या प्रक्रियेला सुरवात

**गोंदिया:-** नवेगावबांध-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात चार ते पाच वाघांना आणण्याची प्रक्रियेला चंद्रपुरात सुरूवात करण्यात आली आहे. त्याकरिता त्यांना पकडण्याची मोहिम सुरू करण्यात आली आहे पण हे कार्य वाटते तितकं सोपं नाही म्हणून यात उशिरा होऊ शकतो शेवटी वाघांना आणायचं आहे. यामुळे या कार्यात किती वेळ लागणार याची शाश्वती आज देता येत नाही पण प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली असल्यामुळे आज नाही तर उद्या कधीतरी हे कार्य होणार असल्याची माहिती नवेगाव- नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे उपवनसंरक्षक व क्षेत्र संचालक जयरामेगौडा आर. यांनी वन व वन्यजीव विषयक अभ्यास दौरा दरम्यान नागझिरा संकुल, नागझिरा वन्यजीव अभ्यारण्य येथे दिली.

या प्रसंगी नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे उपसंचालक पवन झेप, विभागीय वन अधिकारी राजेंद्र सदगीर, सहायक वनसंरक्षक वन्यजीव अभयारण्य चे रोशन राठोड, वन परिक्षेत्राधिकारी अवगान, भोसले, माकडे आदी उपस्थित होते.

एनएनटीआरला २०१८ मध्ये महाराष्ट्रात पहिला व देशात १२ वा तर २०२२ च्या गुणवत्ता तपासणीत राज्यात ४ था व देशात २० वा स्थान मिळाल्याची माहिती दिली.तसेच वनविभागाद्वारे वनपरिसरात काम करतांना लोकोपयोगी व इतर सामाजिक कार्य केले जाते त्याची माहिती देत सामाजिक कार्याअंतर्गत आम्ही वनपरिक्षेत्रालगतच्या गावातील महिला बचत गटांकरिता रेशीम उत्पादन, लाख उत्पादन आदी द्वारे महिलांना रोजगार उपलब्ध करून देणयात येत असल्याची माहिती दिली.

# मटन मार्केटमुळे बनगाववासीयांचे आरोग्य धोक्यात

**आमगाव:** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात असलेल्या मटन मार्केटमधील केरकचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नसल्याने बनगाववासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यासंदर्भात वारंवार तक्रार करुनसुद्धा प्रशासनाने कुठलीच कारवाई न केल्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आमगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचा परिसर खूप मोठा आहे. याच परिसरात मटन व कोंबड्या विक्रेत्यांनी दुकाने थाटली आहेत. येथील बहुतेक दुकानातील निघणारा कचरा व कोंबड्यांचे मास भात गिरणीच्या मागील भागात फेकले जाते.

या दुकानांमध्ये निघणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची गरज असताना मटन



विक्रेते ते रस्त्यालगत फेरत असल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून परिसरात दुर्गंधी निर्माण झाली आहे.

परिणामी या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. बनगाव येथील पंचायत समिती, जुना बनगाव, द्वारकाधाम नगरी, नारायणनगर, शुभमनगर, दत्तात्रयनगर आहे. या मार्गावरुन ये-जा करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा याची तक्रार करण्यात आली. परंतु नगर परिषदेच्या कोणी वाली नसल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याकडे नगर परिषद प्रशासक पूर्ण दुर्लक्ष करत आहेत.

# स्वातंत्र्यानंतरही समतेची कविता लिहावी लागणे हे देशाचं दुर्दैव-डॉ श्रीपाद जोशी

**गोंदिया :-** भारतीय स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेतून,कवी नामदेव ढसाळानी विविध कवितेतून समतेची मांडणी केली परंतु भारतीय राज्यघटनेला अपेक्षित असं घडलं नाही परिणामी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी काळापर्यंत अजूनही साहित्यिकाना समतेच्या कविता लिहाव्या लागतात हे देशाचं फार मोठे दुर्दैव आहे, अशी खंत ज्येष्ठ साहित्यिक डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी बोलून दाखविली. श्री जोशी हे संथागार इथं आयोजित पुस्तकं प्रकाशन समारंभात बोलत होते. कवी नंदू वानखडे यांनी लिहिलेली २ पुस्तके ज्यामध्ये कविता संग्रह 'अंतर्मनातली आंदोलने' आणि कथा संग्रह मज्याला नाही मायफ या पुस्तकांचं प्रकाशन त्यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक प्रा. युराज गंगाराम होते. मंचावर डॉ सुरेश खोब्रागडे,प्रा प्रमोद अनेराव आणि कवी नंदू वानखडे उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ जोशी म्हणाले की, विद्रोहाचे पाणी पेटले आहे.राज्य घटना सांभाळून ठेवणे हे मूठभर लोकांची जबाबदारी नाही, शोषणाचे स्वभाव आणि चरित्र यात बदल झालेला नाही




असे सांगून नंदुची कविता विचारांची चेतना निर्माण करते,असे ते म्हणाले.

यावेळी युवराज गंगाराम यांनी सांगितलं की,कवी नंदू आपल्या कवितेत जीवनाची चर्चा करतो असे सांगून त्यांच्या कवितेला डॉ बाबासाहेब आंबेडकर नावाचे टोकदार शस्त्र आहे असे ते म्हणाले. एकाबाजूला एकाधिकारशाही आणि फॅसीझम डोके वर काढत असतांना धम 'निरपेक्ष कवी हातबांधून कसा काय शांत राहू शकतो असा उलट प्रश्न त्यांनी उपस्थित केला. डॉ खोब्रागडे म्हणाले की कवी सामान्य माणूस नाही.कवीला अन्यायग्रस्तांचे नेतृत्व करावं लागतं. कवी हा योद्धा असून त्याला विविध पातळ्यांवर युद्ध करावा लागतो. कवीला नव्या पिढीचेही भविष्य लिहिण्याची गरज आहे.

प्रा. अनेराव यांनी कवी आणि कथा यामधील फरकाचे स्पष्टीकरण सांगितलं. दरम्यान सामाजिक कार्यकर्त्या ॲड. सविता बेदरकर, मिलिंद रंगारी यांनी कविता संग्रहा तील कविता वाचून दाखविल्या. दरम्यान कवी माणिक गेडाम, कालिदास सूर्यवंशी आदि साहित्यिकांना कथासंग्रह आणि कविता संग्रह भेट देण्यात आले. दरम्यान जूही वानखडे यांनी रमाई हा एकपात्री प्रयोग सादर केला. अत्यंत उत्कृष्ट अशा या कार्यक्रमाची उपस्थितांनी तोंड भरून प्रशंसा केली. यावेळी चित्र प्रदर्शनाचंही पाहुण्यांचे हस्ते उदघाटन करण्यात आलं. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी नंदू वानखडे यांनी केलं. संचालन जूही नंदू वानखडे यांनी तर आभार गौतम गजभिये यांनी मानले. यावेळी मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित होता.

# डेपो सुरु होईना, वाळूची चोरी थांबेना

**गोंदिया:** जिल्ह्यात वाळू घाटांचे लिलाव झाले नसताना शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार वाळू विक्रीचे प्रस्तावित डेपोदेखील अद्याप सुरु होऊ शकले नाहीत. त्यामुळे लिलाव न झालेल्या वाळू घाटांमधून मात्र अवैध उत्खनन आणि वाहतूक सुरुच आहे. त्यामुळे वाळूची चोरी थांबत नसल्याचा पार्श्वभुमीवर शासनाचा महसूल बुडत असल्याचे वास्तव आहे.

जिल्ह्यातील वाळू घाटांचे लिलाव बाकी असतानाच शासनामार्फत वाळूचे नवीन धोरण जाहीर करण्यात आले. ६०० रुपये प्रती ब्रासप ममाणे वाळू देण्याच्या शासनाच्या नवीन वाळू धोरणाची जिल्ह्यात अंमलबजावणी सुरु करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात



जिल्ह्यात वाळू अद्याप बाकी आहे.

वाळू घाटांचे लिलाव नाही आणि लिलाव न झालेल्या वाळू घाटांमधून शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार अवैध उत्खनन आणि अवैध वाहतूक मात्र जोरात सुरु आहे.

त्यामुळे. वाळुची चोरी सुरुच असल्याच्या स्थितीत वाळूच्या रॉयल्टी मधून शासनाच्या तिजोरीत जमा होणारा कोट्यावधी रुपयांचा महसूल बूडत आहे. त्यामुळे जिल्ह्यात सर्रास वाळूची अवैध वाहतूक होत असल्याचे चित्र आहे.

### रात्रीच्या वेळी वाळूची चोरी

**जिल्ह्यात वाळू घाटांचे लिलाव झाले नाही आणि वाळू विक्रीचे डेपोही सुरु झाले नाही. या संधीचा फायदा घेत लिलाव न झालेल्या वाळू घाटांमधून (नदी, नाले) वाळूचे अवैध उत्खनन आणि अवैध वाहतूक सुरु आहे. रात्रीच्या वेळी वाळूचे अवैध उत्खनन आणि वाहतूक केली जात असल्याचे चित्र आहे.**

### चढ्या दराने विक्री

**नवीन वाळू धोरणानुसार ६०० रुपये प्रती ब्रासप्रमाणे वाळू विक्रीचे प्रस्तावित डेपो सुरु होणे बाकी असताना बांधकामासाठी नागरिकांना चढ्या दराने वाळू खरेदी करावी लागत आहे. त्यामध्ये पाच ते सात हजार रुपये प्रती ब्रासप्रमाणे वाळूची विक्री होत असल्याचे चित्र आहे.**

### वाळू डेपोसाठी निविदा

**नवीन वाळू धोरणाच्या अंमलबजावणीत जिल्ह्यात वाळू विक्रीचे ९ डेपो सुरु करण्यासाठी नदीपात्रातून वाळूची उचल करुन डेपोपर्यंत पोहोचविणे आणि वाळू डेपोचे व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हा निविदा समितीमार्फत निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वाळू विक्रीचे डेपो सुरु करण्यासंदर्भात वर्क ऑर्डर देण्यात येणार आहे आणि त्यानंतर प्रत्यक्षात विक्रीचे १८ डेपो सुरु होणार आहेत.**